मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४५ ■ सोमवार, ०२ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# अर्थसंकल्पात परदेशी ज्ञानार्जनास पायघड्या

मुंबई : विद्यार्थ्यांनी परदेशी जाऊन शिकण्यास या अर्थसंकल्पात बळ देण्यात आले आहे. त्याचवेळी भारतातील परदेशातील विद्यार्थ्यांनी भारतात शिक्षणासाठी यावे यासाठी निश्चित करण्यात आलेल्या उद्दीष्टाची पूर्ती रखडण्याची शक्यता आहे. त्याचवेळी भारतातील विद्यापीठांचा दर्जा वाढवण्यासाठी मात्र फारशा ठोस तरतुदी करण्यात आलेल्या नाहीत.



केंद्रीय अर्थसंकल्पात परदेशी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी दिलासा देण्यात आला आहे. लिबरलाईज्ड रेमिटन्स स्कीम या अंतर्गत शिक्षणासाठी होणाऱ्या परदेशी व्यवहारांवरील कर (टीसीएस) कमी करण्यात आला आहे. यापूर्वी शिक्षणासाठी परदेशी पाठवण्यात येणाऱ्या ७ लाख रुपयांवरील रकमेवर पाच टक्के कर आकारण्यात येत होता. ही कमाल मर्यादा या अर्थसंकल्पात वाढवण्यात आली आहे.

तसेच करही कमी करण्यात आला आहे. नव्या तरतुदीनुसार १० लाख रुपयांपेक्षा अधिक खर्चावर दोन टक्के कर आकारण्यात येणार आहे. त्यामुळे परदेशी विद्यापीठांमध्ये भरण्यात येणाऱ्या शुल्कावरील कराचा भार कमी झाल्याने परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना काहिसा दिलासा मिळेल. त्याचवेळी परदेशी जाऊ न शकणाऱ्या परंतु परदेशी विद्यापीठात शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठीही संधी वाढण्याची शक्यता आहे. पाच नव्या शैक्षणिक केंद्रांची (युनिव्हर्सिटी टाऊनशिप) घोषणा करण्यात आली आहे.

सध्या गुजरातमधील गिफ्टसिटी, नवी मुंबईतील शैक्षणिक नगरी (एज्युकेशन सिटी) येथे परदेशी विद्यापीठे त्यांच्या शाखा सुरू करत आहेत. त्याच धरतीवर या पाच नव्या केंद्रामध्येही परदेशी विद्यापीठांना त्यांच्या शाखा सुरू होण्याची शक्यता आहे. देशातील औद्योगिक क्षेत्रांच्याजवळ ही नवी केंद्रे थाटण्यात येणार आहेत. नीती आयोगाची उद्दीष्टपूर्ती लांबणीवरभारतीय विद्यार्थ्यांचा परदेशी शिक्षण घेण्याकडे असलेला ओघ आणि परदेशातील शिक्षणावर होणारा भारतीयांचा खर्च यावर दोन महिन्यांपूर्वी नीती आयोगाने एक अहवाल सादर केला होता. त्यानुसार २०२४ मध्ये १३ लाख ३६ हजार भारतीय विद्यार्थी परदेशी गेले. विविध खासगी संस्थांच्या अभ्यासानुसार ६ लाख कोटी रुपये भारतातून परदेशी गेलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर खर्च झाले.

या पार्श्वभूमीवर परदेशी विद्यार्थ्यांनी भारतात शिक्षणासाठी यावे यासाठी स्वतंत्र धोरण आखण्याची शिफारस या अहवालात करण्यात आली आहे. त्यानुसार २०३५ पर्यंत साडेतीन लाख परदेशी विद्यार्थ्यांनी भारतात शिक्षणासाठी यावे असे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहे.

मात्र, त्यादृष्टीने काही ठोस तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही. आयआयटीची प्रवेश क्षमता साडेसहा हजारांनी वाढवण्याची घोषणा करण्यात आली आहे. मात्र जुन्या आयआयटीपेक्षा २०१४ नंतर स्थापन झालेल्या संस्थांसाठी प्रामुख्याने तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे तेथेही परदेशी विद्यार्थ्यांचा फारसा ओढा नाही.

## शोषितांचा आवाज आणि व्यथा सरकार पर्यंत पोहोचवण्याचे काम मूकनायकातून केले - प्रा. श्रीराम जाधव

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी**

शोषितांचा आवाज आणि व्यथा सरकार पर्यंत पोहोचवण्याचे काम मूकनायकातून केले, असे प्रतिपादन प्रा. श्रीराम जाधव व्यक्त केले. ते शिरूर कासार तालुक्यात प्रथमच साजऱ्या होत असलेल्या मुकनायक दिनानिमित्त बोलत होते.

शिरूर कासार तालुक्यातील राक्षसभुवन (तांबा) येथे मुकनायक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विचार पिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप मिसाळ, प्रमुख पाहुणे युवराज सोनवणे, माजी प्राचार्य सुधाकर खोले, समीर पठाण, आरती वक्ते, नंदकिशोर उपरे, कचरू महाडिक, कार्यक्रमाचे आयोजक प्रमोद निकम, कल्याण तांबे, सिराज सय्यद, भीमराव खोले, दीपक खोले, दत्तात्रय तांबे, भारत पानसंबळ, विष्णू सवासे, बाळकृष्ण मंगरूळकर, प्रतीक भांडेकर, राम खोले, नानासाहेब औसरमल, भीमराव औसरमल, गौतम औसरमल यांची उपस्थिती होती. आपल्या भाषणात पुढे बोलताना प्राध्यापक जाधव म्हणाले, समाजातील वेदना आणि विद्रोह प्रकट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या मुकनायक या पाक्षिकाचा उपयोग झाला.

चळवळीसाठी वृत्तपत्र आवश्यक असते. वृत्तपत्र नसलेली चळवळीची अवस्था पंख छाटलेल्या पक्षाप्रमाणे असते, असे विचार युवराज सोनवणे यांनी मांडले. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य महान असून त्यांनी पत्रकारितेतही योगदान दिले आहे, याची माहिती अनेकांना नाही. या गोष्टीची माहिती होण्यासाठी मूकनायक दिन साजरा केला जातो. असे आपल्या भाषणात बोलताना माजी प्राचार्य सुधाकर खोले म्हणाले. यावेळी जगदंबा विद्यालय, राक्षसभुवन येथील मुख्याध्यापक नंदकिशोर उपरे मूकनायक दिनानिमित्त त्यावेळच्या पत्रकारितेचे महत्त्व सांगितले. पत्रकारिता लोकशाहीसाठी आवश्यक असून मूकनायकांसारखेच काम आजच्या पत्रकारांनीही केले पाहिजे.

समीर पठाण यांनी डोळे असून आंधळे पाय असून पांगळे तोंड असून मुके कान असून बहिरे झालेल्या समाजाला जागा करण्याचे काम बाबासाहेबांनी केले असे सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना दिलीप मिसळ म्हणाले की, १९२० साली मूकनायक या वृत्तपत्राची सुरुवात झाली होती. यासाठी सर्वप्रथम शाहू महाराजांनी २५०० रुपये देणगी दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश औसरमल, राज कातखडे, बाबासाहेब औसरमल, राहुल औसरमल, योगेश धनवे, आश्विन औसरमल, युन्नुस सय्यद, राम औसरमल, तात्यासाहेब सोनवणे, विशाल औसरमल, दीपक औसरमल, शिवनाथ औसरमल, सचिन खोले यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार नवनाथ येवले यांनी, सूत्रसंचालन जयेंद्र निकम तर आभार मनोहर औसरमल यांनी मानले.

## सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटात घड्याळाला सहानभूतीपूर्वक वातावरण

### यावेळी गटात घड्याळाचा गजर होणार नक्कीच

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर लासुर्णे जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा परिषदसाठी उमेदवार म्हणून सौ. माधुरी सागर भिसे तर सणसर पंचायत समिती गणासाठी कु.ज्योस्त्ना मोहन सुरडकर यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली असून स्व. अजितदादा पवार यांच्या अचानक निधनामुळे प्रचाराला ब्रेक लागला होता या काळात सणसर लासुर्णे गटात राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी प्रचार सुरु ठेवला नाही.त्या अनुषंगाने पक्षातील व युतीतील वरिष्ठ नेत्यांनी सणसर येथे शोकसभा घेऊन प्रचारासाठी सुरवात करण्याच्या सूचना कार्यकर्त्यांना व उमेदवार यांना देण्यात आल्या असल्यामुळे गाजावाजा न करता घरोघरी जाऊन पत्रक वाटून घड्याळाचा प्रचार करण्यासाठी सूचना देण्यात आल्या असल्यामुळे उमेदवाराने आपला प्रचार करण्यासाठी सुरवात केली असल्याचे दिसत असून स्व.अजितदादा पवार यांच्या अकास्मिक निधनामुळे सणसर लासुर्णे गटात राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराला सहानभूती पूर्वक वातावरण व चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे.सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सणसर लासुर्णे गट कधीच ताब्यात घेता आला नसून यावेळी स्व.अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी नक्कीच येथील मतदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून देण्यात येणार असल्याची चर्चा सणसर लासुर्णे गटातील गावागावात सुरु असल्याचे दिसत आहे.



## भाजप युतीच्या बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

### आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीने प्रचारात जोरदार आघाडी घेतली असून, विकासाच्या मुद्द्यावर आधारित प्रचारामुळे मतदारांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी आयोजित करण्यात आलेल्या भव्य बाईक रॅलीला मतदार नागरिकांनी उत्स्फूर्त व उदंड प्रतिसाद दिला. यावेळी विभागातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक दिनांक ७ फेब्रुवारी रोजी पार पडणार असून, ९ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजप महायुतीने संपूर्ण पनवेल तालुक्यात विकासकामांचा आढावा घेत जनतेसमोर आपली भूमिका प्रभावीपणे मांडली आहे. भाजप महायुतीने आतापर्यंत राबविलेल्या विविध विकासकामांमुळे सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यात युती नेहमीच अग्रेसर राहिली आहे. याचा सकारात्मक परिणाम नागरिकांच्या जीवनमानावर झाला आहे. केंद्रात व राज्यात भाजपचे 'डबल इंजिन सरकार' कार्यरत आहे. केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समन्वय राहिल्यास विकासकामांना अधिक गती मिळते आणि निधीच्या उपलब्धतेतही अडचणी येत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करायचे असल्यास जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्येही भाजप महायुतीची सत्ता असणे अत्यंत गरजेचे आहे.

पळस्पे व कोन येथून या बाईक रॅलीला सुरुवात झाली. तालुक्यातील विविध भागात झालेल्या या रॅली दरम्यान भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. रॅलीच्या माध्यमातून विकासाचा संदेश घराघरात पोहोचविण्यात आला असून, मतदारांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून भाजप महायुतीला आपला पाठिंबा दर्शविला. एकूणच पनवेल तालुक्यात भाजप महायुतीच्या प्रचाराला मोठा प्रतिसाद मिळत असून, सुज्ञ मतदार नागरिकांचा कौल विकासाच्या बाजूने म्हणजेच भाजप महायुतीकडे झुकत असल्याचे स्पष्ट चित्र दिसून येत असून ही निवडणूक मतदारांनी स्वतःच्या हाती घेतल्याचे वातावरण संपूर्ण परिसरात निर्माण झाले आहे.

## पतीच्या प्रचारासाठी पत्नी सरसावली सरपंच सौ पल्लवी सौरभ झगडे यांची प्रचारात आघाडी

**दैनिक युवक आधार**
**सणसर :-विकास क्षत्रिय**

पतीच्या सामाजिक व सार्वजनिक जीवनातील कार्याला बळ देण्यासाठी सौभाग्यवती पल्लवी सौरभ झगडे स्वतः पुढे येत हे दृश्य समाजात क्वचित पाहायला मिळते अशी प्रेरणादायी भूमिका सौभाग्यवती पल्लवी झगडे यांनी सध्या पार पाडत आहेत पतीच्या शेटफळगढे गणात प्रचारासाठी त्या उत्साहाने आणि जबाबदारीने काम करीत असून नागरिकांमध्ये त्यांचे विशेष कौतुक केले जात आहे सौभाग्यवती पल्लवी झगडे यांनी प्रचारादरम्यान घरोघरी भेटी देत मतदारासी संवाद साधत आहेत पतीच्या कामाचा आढावा प्रसार त्यांच्या विकासात्मक दृष्टकोन यांची माहिती त्या नागरिकांपर्यंत पोहोचवत आहेत युवक महिला जेष्ठ नागरिकांशी थेट संवाद साधुन त्यांनी सकारात्मक वातावरण निर्माण करीत आहेत त्यांचा हा सहभाग केवळ कौंटुबिक कर्तव्यापुरताच मर्यादित न राहता सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारी ठरत आहे माझ्या पतीने नेहमीच नागरिकांसाठी कामे केली त्यांच्या उमेदवारीला जनतेचा पाठिंबा मिळत आहे गणातील युवा मतदार यांना हाच आपला पंचायत समिती सदस्य असावा अशी इच्छा दिसून येत आहे असे मत सौरभ झगडे यांच्या पत्नी सौभाग्यवती पल्लवी झगडे यांनी व्यक्त केले त्यांच्या या कार्यामुळे गणातील प्रचाराला नवी ऊर्जा मिळत असून तरूण पिढीने सामाजिक व लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागी होत असल्याच दिसत आहे श्री.सौरभ झगडे यांच्या पत्नीने सौ पल्लवी सौरभ झगडे व महिलांनी गणातील होम टू होम प्रचार सुरु केल्याची माहिती मतदार बंधूनी यावेळी सांगितले.



## विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरली - लोकनेते रामशेठ ठाकूर

### भाजपयुतीच्या वाढत्या लोकप्रियतेला घाबरून विरोधकांकडून जाणीवपूर्वक अपप्रचार – माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या रणधुमाळीत भारतीय जनता पक्षाने जोरदार शक्तिप्रदर्शन करत प्रचाराचा धडाका लावला आहे. शनिवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत गव्हाण जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार निकिता खारकर तसेच पंचायत समिती गणाच्या उमेदवार जिज्ञासा कोळी यांचा गव्हाण, कोपर, न्हावे व परिसरात जोरदार प्रचार करण्यात आला. .




या प्रचारादरम्यान बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, भाजपने गेल्या काही वर्षांत केलेल्या भरीव विकासकामांमुळे या संपूर्ण परिसराचा कायापालट झाला आहे. आमची कामगिरी जनतेसमोर आरशासारखी स्पष्ट आहे. त्यामुळेच येणाऱ्या निवडणुकीत विरोधकांचा पराभव अटळ असल्याचे चित्र दिसत असून, याच भीतीपोटी विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरली आहे. विरोधक बेताल व खोटा प्रचार आणि दिशाभूल करण्याचे उद्योग करत आहेत. मात्र जनता आता जागरूक असून सत्य ओळखते. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांनीही विरोधकांवर जोरदार टीका करत सांगितले की, गव्हाण जिल्हा परिषद गट हा प्रतिष्ठेचा मतदारसंघ असल्याने भाजप व महायुतीच्या वाढत्या लोकप्रियतेला घाबरून विरोधकांकडून जाणीवपूर्वक अपप्रचार केला जात आहे. मात्र या अपप्रचाराला जनता येत्या निवडणुकीत मतांच्या जोरावर चोख उत्तर देईल, असेही त्यांनी अधोरेखित केले.

या प्रचार मोहिमेदरम्यान माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, भाजप नेते चंद्रकांत भोईर, रवीशेठ पाटील, हेमंत ठाकूर, सचिन घरत, जयवंत देशमुख, किरण देशमुख, विश्वनाथ कोळी, न्हावे सरपंच विजेंद्र पाटील, मंडल अध्यक्ष रुपेश धुमाळ, नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर, अस्मिता घरत, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, योगिता भगत, मीनाक्षी पाटील, सागर ठाकूर, सी. एल. ठाकूर, वंदना पाटील, किशोर पाटील, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, वर्षा नाईक, जयश्री कोळी, विराज देशमुख, बाळू कोळी, सुनील कोळी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रचारादरम्यान परिसरातील नागरिकांकडून उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, भाजप महायुतीच्या उमेदवारांच्या विजयाबाबत कार्यकर्त्यांमध्ये मोठा आत्मविश्वास दिसून येत आहे.

# शेंदुरजना अढाव येथील जिल्हा परिषद शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**मानोरा तालुका प्रतिनिधी**
**नितीन अढाव**

मानोरा तालुक्यातील शेंदुरजना अढाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेला सांस्कृतिक कार्यक्रम आंनदी व उत्साही वातावरणात पार पडला कार्यक्रमात शाळेतील सहभागी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी हिंदी मराठी बंजारा देश गीतावर बहारदार नृत्याचे सादरीकरण करत उपस्थितीची मने जिंकली या कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली या कार्यक्रमाला गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्याच्या कलागुणांचा आनंद घेतला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक युवराज शिंदे यांनी केले जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शिक्षिका रंजना मानके ( कोंगे) मुख्याध्यापक गजानन काटे सर, केंद्र प्रमुख अनिरुद्ध कोंगे सर, प्रदीप काळे यांनी विशेष परिश्रम घेतले.या कार्यक्रमाला गावाच्या सरपंचा पुजा काळे ग्रामसेवक एस आर जाधव, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा लता ससाने,पत्रकार मनोज आडे रवि राठोड अश्विन राठोड ग्रामपंचायत सदस्य आनंदा खिराडे,सत्यम आडे उषाबाई राठोड, धुरपत्ता बाई जाधव,अशोक काळे, अरुण जाधव यांच्यासह माता पालक युवक युवती व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचा समारोप झिंगाट या गीताने करण्यात आले.



# माजी विद्यार्थी हा मविप्रचा खरा कणा” बाळासाहेब क्षीरसागर यांचा ठाम विश्वास

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

बहुजन हिताय, बहुजन सुखाय या ब्रीदवाक्यानुसार शिक्षणाचे कार्य करणाऱ्या मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सन १९७१ पासूनच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचा भव्य आठवणींचा मेळावा उत्साहात पार पडला.

या मेळाव्याच्या अध्यक्षीय मनोगतात मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी संस्थेच्या जडणघडणीत माजी विद्यार्थ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. “संस्थेच्या विकासात समाजातील सर्व घटकांचे सहकार्य लाभले असले, तरी माजी विद्यार्थ्यांचे दानशूरपणा, मार्गदर्शन आणि पाठिंबा मविप्रसाठी मोलाचा ठरला आहे. त्यामुळेच सर्व माजी विद्यार्थी हे मविप्रचे खरे कणा आहेत,” असे त्यांनी सांगितले.



यावेळी व्यासपीठावर उपाध्यक्ष विश्वासजी मोरे, उपसभापती देवरामजी मोगल, संचालक शिवाजी गडाख, संचालिका सौ. शोभाताई भागवत बोरस्ते, भागवत बाबा बोरस्ते, डॉ. उत्तम डेरले, शिक्षणाधिकारी शशिकांत मोगल, के. एस. शिंदे, राजाभाऊ शेलार, अनिल कुंदे, शिवाजी ढेपले, वैकुंठ पाटील, दीपक श्रीवास्तव, ॲड. प्रवीण ठाकरे तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यवर उपस्थित होते.

मेळाव्यासाठी अन्नदान करणारे नंदलाल चोरडिया, राजाभाऊ राठी, अमित पडोळे, नंदकिशोर कापसे, विक्रम रंधवे, संदीप जेउघाले, देवदत्त कापसे तसेच ५१ हजार रुपयांची देणगी देणारे विजय कडलग व २१ हजार रुपयांची देणगी देणारे प्राचार्य डॉ. सुरेश जाधव यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

उपाध्यक्ष विश्वासजी मोरे यांनी १९७१ पासूनचा एकत्रित माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्याच्या संकल्पनेचे कौतुक करत, मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे आभार मानले. उपसभापती देवरामजी मोगल यांनी विविध क्षेत्रात यशस्वी कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत निफाड महाविद्यालयाचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी महाविद्यालय विकासासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

या मेळाव्यात सुमारे ५५ वर्षांतील माजी विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणी, अनुभव व प्रेरणादायी प्रसंग कथन केले. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातर्फे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी मविप्र समाज गीत गायन झाले तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी महाविद्यालयातील शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. सुरेश जाधव यांनी मानले. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी मविप्र कार्यकारिणी, शिक्षणाधिकारी, माजी विद्यार्थी संघ, महाविद्यालय विकास समिती, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी, माजी प्राध्यापक व माजी प्राचार्य उपस्थित होते.

# घाटंजी बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. निता राठोड यांची बिनविरोध निवड; पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून रचला इतिहास

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी**
**- महेश पेन्दोर**

**घाटंजी:** येथील बार असोसिएशनच्या सन २०२६ च्या कार्यकारिणीची निवड नुकतीच उत्साहात पार पडली. या निवडीमध्ये ॲड. सौ. निता मनोज राठोड यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करून इतिहास घडवण्यात आला आहे. घाटंजी बार असोसिएशनच्या पहिल्या महिला अध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांना मिळाला असून, त्यांच्या निवडीने वकील वर्गात आनंदाचे



वातावरण आहे.

तसेच वकील संघाच्या सचिव पदी ॲड. वैभव महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ॲड. महाजन यांनी आपल्या कमी कालावधीच्या कारकिर्दीत केलेल्या उत्तम कामाची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. निवडीनंतर बोलताना नूतन अध्यक्ष ॲड. निता राठोड यांनी महिला वकिलांचे प्रश्न सोडवण्यासोबतच न्यायालयीन प्रशासन आणि वकील यांच्यात चांगला सुसंवाद राखण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तर सचिव ॲड. वैभव महाजन यांनी वकील संघाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि वकिलांना आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे नमूद केले.

या निवड प्रक्रियेवेळी न्यायाधीश श्री पी.आर. पाटील साहेब प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ अधिवक्ता ॲड. विजय भुरे, ॲड. अनंतकुमार पांडे, ॲड. विनय चव्हाण, ॲड. गणेश धात्रक, ॲड. निलेश चवरडोल, ॲड. नेताजी राऊत, ॲड. मनोज राठोड यांच्यासह अनेक कायदेतज्ज्ञ आणि महिला प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या ऐतिहासिक निवडीबद्दल तालुक्यातील राजकीय, सामाजिक आणि कायदे क्षेत्रातील मान्यवरांकडून दोघांचेही अभिनंदन व कौतुक होत आहे.

# पोहंडुळ येथे रब्बी शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे**

**पाथरी**/ पोहंडुळ येथे रब्बी हंगामा विषय मानवत कृषी विभाग व हरितक्रांती जल व भूमी परिक्षण प्रयोगशाळा मानवत यांच्या संयुक्त विद्यमाने मानवत तालुक्यातील पोहंडुळ येथे रब्बी हंगामातील पीक व्यवस्थापन तंत्रज्ञान विकसित या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री पामे मंडळ अधिकारी रामेटाकळी सज्ज सौ रणेर मॅडम उपकृषीअधिकारी भराडे सहाय्यक कृषी अधिकारी व तुकाराम बालटकर व वेळी हरितक्रांती जल व माती परीक्षण प्रयोगशाळा मानवत येथील कर्मचारी मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश बालटकर यांनी केले या वेळी कार्यक्रमास शेतकरी ज्ञानोबा धोपटे मारोतराव नानेकर गंगाधर बालटकर नारायण आरसुळ विक्रम धोपटे कृष्णा धोपटे नामदेव




बालटकर विष्णु धोपटे पुरुषोत्तम धोपटे नारायण धोपटे यांच्यासह शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते या कार्यक्रमांत भराडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले किड व्यवस्थापन व जल व्यवस्थापन या विषयावर मोलाचं मार्गदर्शन केले श्री पामे यांनी सांगितले की महाडिबीटी पोर्टल व कृषी योजनेअंतर्गत माहिती तर तुकाराम बालटकर यांनी माती परीक्षण व माती तपासणीचे शेतकऱ्यांना काय फायदा होतो याविषयी माहिती दिली यावेळी या कार्यक्रमास शेतकरी युवक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# बेलोरा येथे आनंदी बालपण उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी**
**राजु गायकवाड**

बेलोरा येथे सामाजिक उपक्रमांतर्गत छोट्या मुलांसाठी खेळणी वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. स्व. मधुकरराव भगत शहरी व ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था, बेलोरा ता. पुसद जि. यवतमाळ व द किडव्हर्स यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान परिसरातील लहान मुलांना विविध प्रकारची खेळणी वितरित करण्यात आली. लहान वयातच मुलांच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासासाठी खेळण्यांचे महत्त्व लक्षात घेऊन हा उपक्रम



आयोजित करण्यात आल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजकुमार भगत यांनी लहान मुलांना मार्गदर्शन करताना शिक्षण, शिस्त व संस्कारांचे महत्त्व विशद केले. बालवयातच सकारात्मक विचारसरणी, कष्टाची सवय व समाजभान निर्माण झाल्यास भविष्यात सक्षम व जबाबदार नागरिक घडतात, असे त्यां

**नी सांगितले.**

तसेच संस्थेचे उपाध्यक्ष शरद खंदारे यांनीही उपस्थित मुलांना मार्गदर्शन केले. त्यांनी मुलांनी नियमित शिक्षणासोबत खेळ, कला व व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष द्यावे, तसेच आई-वडील व शिक्षकांचा आदर राखून प्रामाणिक प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते, असे प्रतिपादन केले.

या उपक्रमामुळे मुलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, असे यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, स्वयंसेवक तसेच स्थानिक नागरिकांनी सहकार्य केले.

# नागपूर पोलिसांकडून घरफोडी आणि वाहन चोरीचा छडा; ६ गुन्हे उघड, मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक**
**नागपूर विभाग**

**नागपूर:** नागपूर शहरात वाढत्या चोऱ्यांच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेच्या युनिट ५ ने मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून घरफोडी आणि वाहन चोरीचे एकूण सहा गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवाईत पोलिसांनी १ लाख २८ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने, महागडा आयफोन आणि तीन दुचाकी जप्त केल्या आहेत.

ही कारवाई ३१ जानेवारी रोजी मानकापूर परिसरात करण्यात आली. गुन्हे शाखेचे पथक गस्तीवर असताना त्यांना एका लाल रंगाच्या डिओ गाडीवर एक मुलगा संशयास्पदरीत्या जाताना दिसला. पोलिसांनी त्याला थांबवून




गाडीच्या कागदपत्रांची विचारपूस केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी त्याला विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली. या चौकशीत त्याने आपल्या तीन साथीदारांच्या मदतीने हुडकेश्वर, वाठोडा आणि अजनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३ घरफोड्या आणि ३ वाहने चोरल्याची कबुली दिली.

पोलिसांनी या मुलाकडून सोन्याचे मंगळसूत्र, बांगड्या, नेकलेस, चांदीची पायपट्टी, एक आयफोन आणि गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकींसह चोरीची एक गाडी असा एकूण मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणातील एका अल्पवयीन मुलाला पुढील तपासासाठी हुडकेश्वर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंघल आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनायक गोल्हे व त्यांच्या पथकाने केली आहे.

# विकसित भारताचा पाया रचणारा आणि युवाशक्तीला बळ देणारा अर्थसंकल्प – डॉ.गोऱ्हे

## लेकींच्या शिक्षणाला वसतीगृहाचे बळ अन् बचत गटांना सौरऊर्जेची शक्ती; महिला सक्षमीकरणाचा नवा इतिहास! – डॉ. नीलम गोऱ्हे

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनीधी**

: केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा महिला, युवा, शेतकरी आणि ग्रामीण कारागिरांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवणारा आहे. 'महात्मा गांधी ग्राम स्वराज योजने'पासून ते 'युवाशक्ती बजेट'पर्यंतच्या घोषणांमधून सरकारने सर्वसमावेशक विकासाचा संकल्प दिसून येतो, अशी प्रतिक्रिया विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केली.

**डॉ. गोऱ्हे यांनी या अर्थसंकल्प बाबत मांडलेले मुद्दे**

वस्त्रोद्योग, हातमाग आणि हस्तकलेला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू होणारी 'महात्मा गांधी ग्राम स्वराज योजना' ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा ठरेल. महाराष्ट्राच्या दृष्टीने कापूस उत्पादनासाठी जाहीर झालेली नवीन योजना आणि नारळ, काजू तसेच चंदनाच्या परिसंस्थेसाठी केलेली तरतूद शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देणारी आहे.

आर्थिक पाहणी अहवालातील आकडेवारीनुसार, देशातील मुलींच्या जन्मदारात वाढ झाली आहे. 'जल जीवन मिशन'मुळे महिलांच्या वेळेची बचत होत असून आता महिला बचत गट 'छतावरील सौर ऊर्जा' आणि वीज व्यापारात सहभागी होणार आहेत, हे



मुलींच्या जन्मदारात वाढ ते 'जल जीवन'ची क्रांती; हा अर्थसंकल्प महिलांच्या सन्मानाचा - डॉ.गोऱ्हे

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे नवे पर्व आहे. प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी वसतीगृहांची घोषणा केल्याबद्दल त्यांनी अर्थमंत्र्यांचे डॉ.गोऱ्हे यांनी विशेष आभार मानले.

धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. डॉ. गोऱ्हे यांनी विशेषतः मंदिरांच्या विकासासाठी आणि जिर्णोद्धारासाठी जाहीर केलेल्या विशेष निधीचे स्वागत केले. "मंदिरे ही आपल्या संस्कृतीचे केंद्र आहेत. त्यांच्या परिसरातील सोयी-सुविधा आणि संरक्षणासाठी दिलेला निधी भाविकांसाठी मोठा दिलासा ठरेल. तसेच २० महत्त्वपूर्ण पर्यटन स्थळांच्या मॅपिंगमुळे आणि १० हजार प्रशिक्षित गाईड्समुळे स्थानिक रोजगाराला मोठी चालना मिळेल," असे त्या म्हणाल्या.

पाच लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या छोट्या आणि मध्यम शहरांच्या विकासासाठी १२.२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. "महानगरांवरील ताण कमी करण्यासाठी छोट्या शहरांमध्ये सक्षम पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा हा निर्णय दूरदृष्टीचा आहे," असे त्यांनी सांगितले.

भारताला जागतिक 'औषध निर्मिती केंद्र' बनवण्यासाठी क्लिनिकल रिसर्च आणि संशोधनावर दिलेला भर स्वागतार्ह आहे. कर्करोग आणि मधुमेहावरील औषधांच्या किमती कमी होणार असल्याने सामान्य रुग्णांना मोठा आधार मिळेल. बायो-फार्मा क्षेत्रासाठीची १०,००० कोटींची तरतूद आणि ५ प्रादेशिक मेडिकल टुरिझम हब आरोग्य क्षेत्राचा चेहरामोहरा बदलतील.

या अर्थसंकल्पाला 'युवाशक्ती बजेट' असे संबोधून डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, पूर्व भारतात नवीन 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन'ची स्थापना, पाच विद्यापीठ टाउनशिप आणि २० पर्यटन स्थळांवर १० हजार गाईड्सना दिले जाणारे प्रशिक्षण यामुळे युवकांसाठी रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण होतील.

शहरी विकासासाठी १२.२ लाख कोटींची तरतूद आणि मुंबई-पुणे, पुणे-हैद्राबाद यांसारख्या सात अतिजलद रेल कॉरिडॉर्समुळे दळणवळण वेगवान होऊन उद्योगांना मोठी गती मिळेल.

"जीडीपीच्या ४.५% पेक्षा कमी वित्तीय तूट राखण्याचे वचन पूर्ण करून सरकारने आपली आर्थिक शिस्त सिद्ध केली आहे. आयुर्वेद निर्यातीला दिलेले बळ आणि आधुनिक पायाभूत सुविधांमुळे भारत २०२५-२६ मध्ये महासत्तेकडे वेगाने वाटचाल करेल," असा विश्वास डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शेवटी व्यक्त केला.

# डोळ्यात पाणी,मनात स्वप्न जवाहर विद्यालयाचा भावुक निरोप.. दहावी–बारावीच्या विद्यार्थ्यांना यशाचा आणि संघर्षाचा मंत्र

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे**

:दिनांक 30 जानेवारी 2026 रोजी जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,वाडी येथे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड येथील प्रा. डॉ. ज्ञानेश्वर शेजुळ तसेच एमपीएससी स्पर्धा परीक्षेचे प्रमुख मार्गदर्शक व ग्रंथपाल श्री. ज्ञानेश्वर हिलाले हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य श्री.शिंदे होते.यावेळी आर. एस. तिडके, एस. आर.वावधने, एस. बी. निकम,प्रा. ए. पी. झिने,प्राध्यापिका सौ. मनीषा सोन्ने,प्रा.बी.आर. वाघमारे, एम. ए. रगडे,पी. पी. वाघमारे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्राचार्य श्री. शिंदे यांनी प्रमुख पाहुण्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणी,शिक्षकांचे योगदान आणि मैत्रीचे महत्त्व यावर आपले मनोगत व्यक्त केले.त्यांच्या भावना ऐकून उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. ज्ञानेश्वर शेजुळ यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेचा ताण न घेता आत्मविश्वासाने परीक्षा देण्याचा सल्ला दिला.परीक्षेत स्वच्छ व स्पष्ट अक्षरात उत्तरे लिहिण्याचे महत्त्व सांगत,शालेय परीक्षेबरोबरच जीवनाच्या परीक्षेत यशस्वी होण्यासाठी संस्कार व सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शक श्री. ज्ञानेश्वर हिलाले यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून महत्त्वपूर्ण संदेश दिला. "आजचा विद्यार्थी मोबाईलवर जास्त अवलंबून होत आहे.मात्र यशाचा खरा मार्ग पुस्तकांमधूनच जातो.अभ्यासासाठी मोबाईलचा अतिरेक टाळा,पुस्तकांचे वाचन वाढवा," असे त्यांनी ठामपणे सांगितले. स्वतःच्या अनुभवांवरून त्यांनी विद्यार्थ्यांना मेहनत, चिकाटी आणि योग्य दिशेने वाटचाल करण्याचे आवाहन केले."स्वतःच्या कष्टावर उभे राहून यश मिळवा, ज्ञानाच्या बळावर सुंदर भविष्य घडवा," असा सल्ला देत त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील संघर्षासाठी तयार राहण्याची प्रेरणा दिली.निरोप देताना प्राचार्य श्री. शिंदे यांनी सांगितले की, शालेय शिक्षण आणि शिक्षकांचे मार्गदर्शन हेच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचे भक्कम पायाभूत स्तंभ आहेत. विद्यार्थ्यांनी शाळेने दिलेल्या संस्कारांचा उपयोग करून यशस्वी आयुष्य घडवावे, असे त्यांनी नमूद केले.हा निरोप समारंभ दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत संस्मरणीय ठरला.विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवून भविष्यातील वाटचालीसाठी नवी उमेद व प्रेरणा घेतली. समारंभाची सांगता विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन करण्यात आली.

# पनवेलमध्ये विद्यार्थ्यांचा मानवी तस्करीविरोधात बुलंद आवाज — 'वॉक फॉर फ्रीडम' रॅलीत जल्लोषात फिरली....

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**उरण रायगड**

पनवेल | ३१ जानेवारी २०२६ रोजी मानवी तस्करीसारख्या गंभीर आणि वाढत्या सामाजिक समस्येविरोधात जनजागृती निर्माण करण्यासाठी भगुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ, पनवेल येथे 'वॉक फॉर फ्रीडम' या शांततामय जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत १०० हून अधिक विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मानवी तस्करीविरोधात ठाम सामाजिक भूमिका मांडली. देशभरातील ३० हून अधिक शहरांमध्ये एकाच वेळी पार पडलेल्या या उपक्रमाचा पनवेलमधील कार्यक्रम हा महत्त्वाचा घटक ठरला.

रॅलीचे उद्घाटन अध्यक्ष मा. आर. व्ही. येओले, मुख्य कार्यक्रम अधिकारी श्री. आकाश पाटील, प्रा. डॉ. सानवी अभिषेक देशमुख, BALLB कॉर्डिनेटर प्रा. धनश्री कदम आणि एनएसएस कार्यक्रम अधिकारी श्री. रुपेश माने यांच्या हस्ते करण्यात आले. सहभागी विद्यार्थी व नागरिकांनी मौन पाळत एकेरी रांगेत शहरातून फेरी काढली. हातात जनजागृतीपर फलक घेऊन त्यांनी मानवी तस्करीच्या बळींप्रती एकात्मता, सहवेदना आणि सामाजिक जबाबदारीचा ठोस संदेश दिला. रॅलीची सुरुवात महाविद्यालयातून होऊन खांदा कॉलनी मंदिरापर्यंत जाऊन पुन्हा महाविद्यालयात समारोप करण्यात आला. रॅलीपूर्वी विद्यार्थ्यांना १०९८ (चाइल्डलाईन), १८१ (महिला हेल्पलाईन) आणि १९३० (सायबर गुन्हे हेल्पलाईन) या महत्त्वाच्या हेल्पलाईन क्रमांकांची माहिती देण्यात आली. तसेच सतर्क व जबाबदार नागरिक म्हणून कार्य करण्याची शपथ विद्यार्थ्यांनी घेतली. हा उपक्रम आंतरराष्ट्रीय संस्था A21 यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या मोहिमेचा भाग असून भारतात 'द मूव्हमेंट इंडिया' या संस्थेमार्फत राबविला जात आहे. महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) यांच्या अहवालानुसार जगभरात सुमारे ४९.६ दशलक्ष लोक आधुनिक गुलामगिरीत अडकलेले आहेत. तसेच NCRB च्या अहवालानुसार भारतात दररोज अनेक मुले मानवी तस्करीचे बळी ठरत आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी उचललेले हे पाऊल सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे, जागरूकता निर्माण करणारे आणि प्रेरणादायी मानले जात आहे.या उपक्रमासाठी प्राचार्या डॉ. सानवी देशमुख, प्रा. फसीहुर रहमान व प्रा रोहिणी कल्याणकर यांचे विशेष सहकार्य लाभले. यांच्यात सहकार्यामुळे सदर उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.





# चिखली पोलीस ठाण्याला घेराव – किनोळा प्रकरणाला वेग!

## ठाणेदार भूषण गावंडे यांच्या तत्पर कारवाईमुळे एक आरोपी ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**

मौजे किनोळा, ता. चिखली, जि. बुलढाणा येथे दिनांक 30 जानेवारी 2026 रोजी मध्यरात्री घडलेल्या धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली. गावातील समाजकंटकांनी सम्यक बुद्ध विहारासमोरील विद्युत मीटर तोडून लाईन बंद केली आणि अंधाराचा फायदा घेऊन विहारातील महापुरुषांच्या प्रतिमांची विटंबना करण्याच्या उद्देशाने पुढे कूच केले.

सुदैवाने त्या वेळी काही सजग बौद्ध समाज बांधवांच्या हा प्रकार लक्षात आला. त्यांनी आरोपींना पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र ते पळून जाण्यात यशस्वी झाले. त्याच रात्री समाज बांधव चिखली पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले, मात्र सुरुवातीला ठोस कारवाई न झाल्याने नाराजी वाढली.31 जानेवारी 2026 रोजी, भीम आर्मी (आझाद समाज पार्टी प्रणित) चे बुलढाणा जिल्हाध्यक्ष सिद्धांत भाई वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस ठाण्याला शांततापूर्ण घेराव घालण्यात आला. त्यांनी संयमित, कायदेशीर मार्गाने आंदोलन करत समाजाच्या भावना ठामपणे प्रशासनापुढे मांडल्या. "विहाराच्या सन्मानाशी कोणतीही तडजोड होणार नाही," असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. या आंदोलनानंतर चिखली पोलीस ठाण्याचे ठाणेदार भूषण गावंडे यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तात्काळ तपासाला गती दिली. समाजाशी संवाद साधत, विश्वास निर्माण करत आणि जलद तपास करत त्यांनी संवेदनशीलता व कर्तव्यनिष्ठेचे दर्शन घडवले. त्यांच्या तत्पर कारवाईमुळे एक आरोपी ताब्यात घेण्यात आला असून उर्वरित तीन आरोपींचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, विहाराच्या पवित्रतेवर आघात करणाऱ्यांना कठोर शासन केल्याशिवाय ही लढाई थांबणार नाही. समाजाच्या सन्मानासाठी आणि कायद्याच्या रक्षणासाठी पोलिस व समाज एकत्र उभे असल्याचा ठाम संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

> पोलीस प्रशासनाची ठाम भूमिका
> किनोळा येथील घटनेनंतर पोलिसांनी तपासाला वेग दिला. अवघ्या काही तासांत एक आरोपी ताब्यात घेतला असून उर्वरित आरोपींनाही अटक करून कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही प्रशासनाने दिली आहे...
> **ठाणेदार भूषण गावंडे, चिखली**

> समाजाचा संयम, नेतृत्वाचा आवाज
> समाजाचा संताप हिंसेत न उतरता शांततापूर्ण मार्गाने व्यक्त करण्यात आला. भीम आर्मीच्या नेतृत्वाखाली अन्यायाविरुद्ध कायदेशीर लढा देण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला...
> **सिद्धांत भाई वानखेडे, जिल्हाध्यक्ष – भीम आर्मी (बुलढाणा)**

# संत रोहिदास महाराज जयंती साजरी; समता-बंधुतेचा संदेश

**दैनिक युवक आधार**
**मुदखेड | प्रतिनिधी योगेश चौदंते**

समता आणि बंधुतेची शिकवण देणारे संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त मुदखेड येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमातून समाजात समता, बंधुता व सामाजिक सलोखा जपण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी भाजपा गट नेते तथा माजी नगराध्यक्ष सुनिल शेटे, माजी नगरसेवक कैलास गोडसे, नगरसेवक प्रा. संजय सोनटक्के, मुजीब पठाण, नईम भाई, बोकेफोड, नगरसेवक अविनाश चौदंते, माजी सैनिक संजय चव्हाण, सुधाकर सूर्यवंशी, दत्ता सोनटक्के, सुभाष दुधंबे, बालाजी सोनटक्के, गजानन सोनटक्के, धारबा सोनटक्के, प्रदीप अन्नपूर्णे

यांच्यासह विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान संत रोहिदास महाराजांच्या विचारांचा समाजासाठी असलेला महत्त्वपूर्ण संदेश उपस्थितांनी अधोरेखित केला. त्यांच्या विचारांप्रमाणे समतेवर आधारित समाजनिर्मितीसाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# गुळसुंदे ग्रामपंचायतीत संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

तालुक्यातील गुळसुंदे ग्रामपंचायत कार्यालयात थोर समाजसुधारक, संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती आज (दि. ०१ फेब्रुवारी)मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादनाने करण्यात आली.





कार्यक्रमप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी संत रोहिदास महाराज यांच्या जीवनकार्यावर सखोल मार्गदर्शन केले. समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि मानवतावादी विचारांचा प्रसार करण्याचे कार्य संत रोहिदास महाराज यांनी आपल्या आयुष्यातून केले. समाजातील जातीभेद, विषमता व अन्याय दूर करून सर्वांना समानतेची व सन्मानाची वागणूक मिळावी, हा त्यांचा संदेश आजच्या काळात अधिकच महत्त्वाचा असल्याचे मत माजी सरपंच आर. डी. पाटील यांनी व्यक्त केले. त्यांच्या विचारांचा स्वीकार करून सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारी आजच्या पिढीवर असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. या जयंती कार्यक्रमास गुळसुंदे ग्रामपंचायतीच्या सरपंच मिनाक्षी जगताप, ग्रामपंचायत सदस्य सतिश साठे, सदस्या अपर्णा चौलकर, ताई गायकवाड, सामाजिक कार्यकर्ता चिंतामण कडवे यांच्यासह राजेश साठे, अंकुश साठे, विनायक पाटील, सुनील पालकर, अशोक गायकवाड, संतोष चौलकर, योगेश साठे, स्वप्निल चौलकर, सचिन गायकवाड, आतिष पाटील, संकेत चौलकर, समाधान गायकवाड, सुशीला गरुडे, अनिता गायकवाड, सखुबाई साठे, नंदा चौलकर, शोभा गायकवाड, ज्योती कडवे, स्वाती गायकवाड, ऋतुजा कडवे, नमिता कडवे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत रोहिदास महाराज यांचे विचार समाजात रुजवण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने होणे आवश्यक असल्याचे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले.

# अजितदादा पवार यांना नाशिकच्या विविध क्रीडा संघटना आणि कालिका देवी मंदिर संस्थान यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

**दैनिक युवक आधार**
**निफाड क्रीडा प्रतिनिधी**
**विलास गायकवाड**

नाशिक दिनांक १ फेब्रुवारी :- कालिका देवी मंदिर संस्थान आणि नाशिकच्या विविध क्रीडा संघटना यांच्यातर्फे कल दिनांक ३१ जानेवारी रोजी कालिका मंदिर संस्थांनच्या हॉलमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलीम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.




या श्रद्धांजलीसाठी विविध राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी, विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या आणि नगरसेवक हेमलता पाटील यांनी अजित पवार यांच्याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. आमची गेल्या २५ वर्षांपासूनची जवळीक आहे आणि मी नाशिकच्या महानगर पालिकेमध्ये नगरसेवक म्हणून निवडून आल्यावर पहिला फोन अजित दादांना केला होता आणि त्यांनी मला माझ्या पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या होत्या. त्यांच्या अपधाती जाण्याने समाजाची फार मोठी हानी झाली आहे असे सांगितले. माजी आमदार नितीन भोसले यांनीही अजित दादा यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याबरोबरच क्रीडा क्षेत्रासाठी फार मोठे योगदान आहे. स्पर्धा आयोजन, खेळाडूंना विविध सुविधा, खेळाडूंच्या प्रगतीसाठी त्यांचे योगदान मोठे आहे असे त्यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस नानासाहेब महाले यांनी दादांच्या गेल्या २५ -३० वर्षाच्या राजकीय प्रवासाबद्दल बोलतांना सांगितले की, त्यांची पक्षशिस्त, वक्तशीरपणा, सकाळी सहा ते रात्री अकरा पर्यंत सतत काम करण्याची पद्धत, त्यांच्याकडे आलेल्या माणसाचे समाधान नक्कीच होणारही दादांची काम करण्याची पद्धत मी इतके वर्षे प्रत्यक्षात अनुभवलेली आहे असे सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि क्रीडा संघटक अर्जुन टिळे यांनी सांगितले की आमची रोज चर्चा होत असे. ते महाराष्ट्र ऑलीम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष होते. मिनी ऑलीम्पिक स्पर्धा नाशिकला आयोजित करण्यासाठी त्यांनी मला संमती दिली होती. क्रीडा संचालक प्रा. हेमंत पाटील यांनी सांगितले की, नाशिकमध्ये लावलेल्या मॅरेथॉन स्तंभाचे अजितदादा यांनी कौतुक करून नाशिकमध्ये पुण्याच्या पेक्षाही चांगले उपक्रम राबवले जातात असे सांगितले. नगरसेवक आणि राजकीय आणि सामाजिक नेते विद्यमान नगरसेवक सुरेश अण्णा पाटील यांनी सांगितले की कार्यकर्त्यांना कसे मोठे करायचे हे त्यांच्याकडून शिकावे असे सांगितले. मंदार देशमुख यांनी त्यांच्या खो-खो, कबड्डी कुस्ती या देशी या खेळाच्या संदर्भात अनेक महत्वपूर्ण घेतले, अनेक योजना राबवल्या आहेत. त्यामुळे या खेळांच्या खेळाडूंना क्रिकेट खेळाडूंप्रमाणे सुविधा मिळाव्यात यासाठी दादा नेहमी आग्रही होते असे सांगितले. निवृत्त डी. वाय. एस. पी. चंद्रकांत बनकर यांनी त्यांच्या पोलिसा नोकरीच्या काळात अजित दादांच्या सोबतचे अनुभव व्यक्त केले. यावेळी राजेंद्र निंबाळते (स्विमिन्ग), हिरामण वाघ (कुस्ती), दीपक निकम ( सेपक टकरा) उदय खरे ( तलवारबाजी), अंबादास तांबे (रोईंग), चंद्रहास कुलकर्णी, अशोक बोरस्ते यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. शेवटी कालिका देवी मंदिर संस्थानचे अध्यक्ष यांनी सांगितले की, महाराष्ट्राचे राष्ट्रीय नेते यशवंतराव चव्हाण, सुधाकरराव नाईक, शारदचंद्र पवार, विलासराव देशमुख यांनी जसे महाराष्ट्राचे नावं देशामध्ये उंच केले, त्या दर्जाचे अजितदादा पवार हे नेते होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रात कधीही भरून न निघणारी मोठी पोकळी निर्माण झाली आहे, त्यांच्या कार्याला असेच पुढे नेण्याचे काम आपण सर्वानी मिळून केले पाहिजे, हीच खऱ्या अर्थाने अजितदादांना अदारांजली राहील आहे सांगितले.या श्रद्धांजली सभेसाठी सुभाष तलाजीया, डॉ. प्रतापराव कोठावळे, दत्ता पाटील, अशोक दुधारे, आनंद खरे, राजू शिंदे, अविनाश खैरनार, शशांक वझे, नितीन हिंगमिरे, मनोज म्हस्के, भूषण भटाटे, उमेश सेनभक्त, कुणाल अहिरे आणि विविध खेळांचे खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्वानी हात जोडून अजित दादांना श्रद्धांजली अर्पण केली.

# माझा आधार हरपला...दानवे यांचे भावनिक उद्‌गार

## जितदादांच्या कार्यस्मरणावेळी श्रद्धांजली सभेत अश्रू अनावर

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे**
**:भोकरदन**

येथील माजी आमदार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांच्या संपर्क कार्यालयात अजितदादा पवार यांच्या कार्याला अभिवादन करत श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेस महाविकास आघाडी तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



उपस्थितांनी दोन मिनिटांचे मौन पाळून आदरांजली अर्पण केली.यावेळी माजी आमदार चंद्रकांत दानवे भावुक झाले. ते म्हणाले,"अजितदादांनी भोकरदन-जाफ्राबाद मतदारसंघासाठी अनेक महत्त्वाची कामे केली.मी फोन केला की त्यांनी कधीच निराश केले नाही." 220 केव्ही उपकेंद्र, भोकरदन–मालखेडा रस्ता,तहसील कार्यालयाचे उद्घाटन तसेच आण्णाभाऊ साठे विकास महामंडळांतर्गत निधी मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले.गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण,वैद्यकीय प्रवेश,वस्तीशाळा शिक्षकांचे प्रश्न तसेच सिंचन योजनांसाठी अजितदादांनी मोलाची मदत केली, असेही दानवे यांनी नमूद केले.त्यांच्या जाण्याने राज्याच्या सार्वजनिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त करून आदरांजली अर्पण केली.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# ग्रामस्थांच्या स्वागताने महिला सरपंच झाले भावुक

## पंजाबमधील महिला सरपंचांनी केला चालूक्य कालीन येरगीचा अभ्यास दौरा.

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी:**
**महादेव उप्पे**

**देगलूर(दि.०२)** पंजाबमधील महिला सरपंचांनी तालुक्यातील चालुक्य काळातील येरगी गावास भेट दिली आणि तेथील ऐतिहासिक वारसा आणि प्राचीन स्थापत्य कलेची माहिती घेतली.येरगी येथे आल्यावर ग्रामपंचायत,बालिका पंचायत राज,विद्यार्थ्यांचे लेझीम पथक आणि ग्रामस्थांनी केलेल्या स्वागताने पंजाबमधील सर्व महिला सरपंच व अधिकारी भारावून गेले. येरगी स्थापत्य कलेचा व विकासाचा अभ्यास करण्यासाठी पंजाब सरकारने त्यांना यशदा पुणे मार्फत पाठवले होते.

**बालिका पंचायत राज च्या वतीने स्वागत**

पंजाबच्या सर्व महिला सरपंच व पदाधिकारी हे गावात आल्यावर सर्वप्रथम त्यांच्या प्रमुखांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यानंतर बालिका पंचायत राज समितीच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले.याप्रसंगी गावातील शालेय विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने संगीतमय लेझीम नृत्य सादर करून त्यांचे स्वागत केले.

यावेळी सरपंच श्रीमती संगीता पाटील मठवाले,गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे,

सरपंच प्रतिनिधी संतोष पाटील,विस्तार अधिकारी बालाजी उमाटे,दत्तात्रेय कुरुंदे,ग्राम पंचायत अधिकारी राजेश तोटावाड

सर्व ग्राम पंचायत सदस्य व गावकरी उपस्थित होते.

**गावाच्या प्रवेशद्वारावर फुलांच्या पाकळ्यांनी स्वागत**

शुक्रवारी,पंजाबच्या महिला सरपंच सकाळी ११.३० वाजता गावात दाखल झाल्या.येरगी बालिका पंचायत आणि गावातील शेकडो महिलांनी गावाच्या प्रवेशद्वारावर सर्व पाहुण्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला.तसेच, बालिका पंचायतने व गावातील महिलांनी त्यांच्यावर गुलाब आणि इतर फुलांच्या पाकळ्यांची पुष्पवृष्टी केली.या स्वागताने संपूर्ण पाहुणे भारावून गेले होते.

**पाहुण्यांच्या हस्ते एक पेड माँ के नाम अभियान अंतर्गत गावात वृक्षारोपण**

येरगी मध्ये एक पेड माँ के नाम



अभियान अंतर्गत चालू असलेले वृक्षारोपण अभियानाची माहिती देऊन रस्त्याच्या दुतर्फा पंजाब च्या महिला सरपंचांच्या हस्ते रोपे लावली.यावेळी बालिका पंचायत च्या पदाधिकाऱ्यांनी गावात चालू असलेल्या वृक्षारोपण चळवळीची माहिती सांगितली.

**ग्राम सचिवालयात कार्यक्रमाचे आयोजन**

सर्व पाहुण्यांचे वाजत गाजत,लेझीम पथकाच्या नृत्याने गावात मिरवणुकीची सांगता झाल्यावर ग्राम सचिवालयाच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिथे ग्रामपंचायतीने सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच श्रीमती संगीता पाटील मठवाले होते.याप्रसंगी गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे,यशदा पुणे येथील राजू वानखेडे,संतोष पाटील, सहाय्यक गटविकास अधिकारी दत्तात्रय कुरुंदे,विस्तार अधिकारी बालाजी उमाटे,ग्रामपंचायत अधिकारी राजेश तोटावाड,इत्यादी उपस्थित होते. यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे यांनी केले आणि सरपंच प्रतिनिधी संतोष पाटील यांनी गावाची ऐतिहासिक माहिती दिली.ज्यामध्ये ११ व्या शतकातील चालुक्य राजवंशाच्या शासकाचे येरगी निवासस्थान असल्याची माहिती तसेच गावात असलेले प्राचीन स्थापत्य कलेचे अद्भुत ऐतिहासिक वारसा,शिलालेख, केशवेश्वर मंदिर,सरस्वती मंदिर इत्यादींची माहिती देण्यात आली.

यावेळी बालिका पंचायतची सचिव महादेवी दाणेवार यांनी बालिका पंचायत द्वारे गावात राबवत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली.गावातील मुलींच्या सुरक्षेसाठी सरपंच संतोष पाटील यांच्याकडून राबविण्यात आलेल्या कराटे प्रशिक्षण,योग-प्राणायाम,

बालविवाह बंदी,गावातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून करत असलेले प्रयत्न आदींची माहिती दिली.

**पीपीटीद्वारे दिली गाव विकासाची माहिती**

ग्राम सचिवालयात झालेल्या कार्यक्रमानंतर,पाहुण्यांना गावाची शाळा दाखवण्यात आली जिथे पीपीटीने आजपर्यंत ग्रामपंचायतीने गावात केलेल्या कामांची माहिती दिली.वरील माहितीने सर्व पाहुणे प्रभावित झाले आणि पंजाबला गेल्यानंतर त्यांनी पंजाबमध्ये येथील विशेष मोहिम राबविण्याचा संकल्प केला.बालिका पंचायतीने दर रविवारी राबविण्यात येणारे स्वच्छता,अभियान,बालविवाह प्रतिबंध,दारू आणि हुंडाबंदीच्या निर्णयाचे कौतुक केले.

बालिका पंचायत राजने गावात चालवलेल्या विविध मोहिमांची माहिती घेतल्यानंतर,दारूबंदी, हुंडाबंदी,मुलींचे शिक्षण, बालविवाह बंदी इत्यादींबाबत त्यांच्याकडून चालवल्या जाणाऱ्या मोहिमांचे कौतुक केले.आणि सर्व महिला सरपंचांनी बालिका पंचायतीला पंजाबला येण्याचे आमंत्रण दिले. अवघ्या तासातच बालिका पंचायत व अन्य महिला पंजाबच्या महिला सरपंचा सोबत मिसळल्या आणि त्यांच्यासोबत सेल्फी काढण्याचा मोह आवरला नाही.

**पंजाबच्या सरपंचांनी गावातील स्वच्छतेचे केले कौतुक.**

पीपीटीची माहिती घेतल्यानंतर सर्व पाहुण्यांनी गावात फेरफटका मारली.त्यांना चालुक्य काळातील सर्व मंदिरे आणि गावात असलेल्या त्यांच्या कलाकृतींची माहिती दिली . गावात भेट देताना त्यांनी गावात दिसणाऱ्या स्वच्छतेचे कौतुक केले आणि गावात दर रविवारी होणाऱ्या स्वच्छता मोहिमेची माहिती घेतली. त्यांना गावात असलेल्या चालुक्य काळातील १८ विहिरी आणि २ बारवांची माहिती मिळाली आणि चालुक्य काळातील पाणीपुरवठा योजनेच्या अद्भुत स्थापत्यकलेमुळे प्रभावित झाले.तसेच,या प्राचीन विहिरींमधील पाणी पिऊन त्यांनी ते अतिशय गोड असल्याचे सांगितले.

पंजाबमधील महिला सरपंचांनी सकाळी ११.३० ते सायंकाळी ४.३० पर्यंत वेळ दिला आणि गावातील महिलांमध्ये मिसळल्या आणि येरगीहून निघताना त्यांचे डोळे अश्रूंनी भरले होते.त्यांनी सांगितले की आजपर्यंत आम्हाला इतरत्र कुठेही असे प्रेम,आदर मिळाला नाही.

कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी मरखेल पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक आर.एम.हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.तसेच आरोग्य विभाग, महावितरण कर्मचारी,कृषी विभाग,तहसील कार्यालय, शाळेतील शिक्षक आणि महिला शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष पाटील,ग्रामपंचायत अधिकारी राजेश तोटावाड,सर्व ग्राम पंचायत सदस्य,शालेय शिक्षण समितीचे सर्व पदाधिकारी,बालिका पंचायतचे सर्व पदाधिकारी,शाळेतील शिक्षकवृंद आणि सर्व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# सरकारी बाबूंच्या हप्त्यांमुळे रस्त्यावरील अतिक्रमण कायम

## प्रशासन लोकप्रतिनिधींच्या निष्क्रियतेमुळे अपघाताचा धोका

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे**

राज्यातील प्रमुख शहरे आणि उपनगरांमध्ये रस्ते, फुटपाथ आणि सार्वजनिक मोकळ्या जागांवरील अतिक्रमणांनी अक्षरशः विळखा घातला असून लोकप्रतिनिधी सोबतच सरकारी अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर असताना प्रशासन मात्र केवळ तात्पुरत्या कारवायांपुरतेच मर्यादित राहत असल्याचा आरोप पादचारी करत आहेत.



अतिक्रमणामुळे रस्ते अरुंद झाल्याने आपत्कालीन सेवा अडथळ्यात सापडण्याचा धोका वाढला आहे. रुग्णवाहिका किंवा अग्निशमन वाहन वेळेत पोहोचू शकणार नाही, अशी स्थिती अनेक ठिकाणी निर्माण झाली आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा सवाल नागरिक विचारत आहेत.

फुटपाथवर अतिक्रमण झाल्याने पादचाऱ्यांना थेट वाहनांच्या मार्गातून चालावे लागत आहे. परिणामी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. गर्दीच्या भागात वाहतुकीचा वेग मंदावत असून अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अनेक ठिकाणी किरकोळ अपघात, वाद आणि धक्काबुक्कीच्या घटना घडत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

नागरिकांच्या मते, वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नाही किंवा झालीच तर ती केवळ दिखाऊ स्वरूपाची असते. काही तासांत किंवा काही दिवसांत पुन्हा तेच अतिक्रमण उभे राहत असल्याने सरकारी अधिकाऱ्यांच्या व लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर संशय निर्माण झाला आहे. सार्वजनिक जागा मोकळ्या ठेवण्याची जबाबदारी असताना ती सातत्याने टाळली जात असल्याचा आरोप केला जात आहे.

दरम्यान, राज्यातील अनेक भागांमध्ये अतिक्रमण टिकून राहण्यामागे "हप्ते संस्कृती" कार्यरत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. अतिक्रमणधारकांकडून नियमित रक्कम घेतली जात असल्यामुळे कठोर कारवाई टाळली जाते, असा आरोप होत आहे. पोलिस आणि पालिका यंत्रणांकडून याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात असल्याचा संशय नागरिक व्यक्त करत आहेत. मात्र याबाबत कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नाही.

सार्वजनिक जागा काही मोजक्या घटकांच्या ताब्यात देऊन सामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळ केला जात असल्याची भावना तीव्र होत आहे. अतिक्रमणमुक्त रस्ते, सुरक्षित पादचारी मार्ग आणि कायमस्वरूपी कारवाईची मागणी राज्यभरातून जोर धरू लागली आहे. मोठी दुर्घटना घडण्याआधी प्रशासनाने ठोस निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# वाशिम शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेतील दुजाभाव थांबवावा असे सावता परिषदचे शहराध्यक्ष चेतन संतोषराव इंगोले.

### वाशिम शहराच्या वतीने व आरती संतोष ठोके यांच्यावतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन .

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

वाशिम:- शहरात नगरपरिषदेच्या वतीने सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, या कारवाईत फक्त फुटपाथवर उपजीविकेसाठी व्यवसाय करणाऱ्या गोरगरीब, कष्टकरी व महिलांवरच हातोडा चालवला जात असल्याचा आरोप होत आहे. तर दुसरीकडे, अवैध परवानग्यांवर उभारलेल्या मोठमोठ्या इमारती व पक्की बांधकामे मात्र कारवाईपासून दूर असल्याचे चित्र दिसून येत आहे.




लहान व्यावसायिकांची उपासमारीकडे वाटचाल

सिव्हिल लाईन परिसरात देशमुख हॉस्पिटल ते महिला बचत गट परिसरात नुकत्याच झालेल्या अतिक्रमण हटाव कारवाईत अनेक लहान व्यावसायिकांचे हातावर पोट असलेले व्यवसाय उद्ध्वस्त झाले. या कारवाईमुळे अनेक कुटुंबांचे एकमेव उत्पन्नाचे साधन अचानक बंद झाले असून, विशेषतः महिला बचत गटाशी संबंधित महिलांसमोर आर्थिक असुरक्षिततेचे गंभीर संकट उभे ठाकले आहे.

नियम गोरगरीबांसाठीच का?

शहर सुशोभीकरण आणि शासन नियमांची अंमलबजावणी आवश्यक असल्याचे मान्य असले, तरी नियमांचा बडगा केवळ दुर्बल घटकांवरच उगारला जात असेल, तर तो अन्यायकारक ठरतो, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे. अवैध बांधकाम करून कोट्यवधींच्या इमारती उभारणाऱ्यांवर मात्र अद्याप ठोस कारवाई का नाही, असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडे कडक शब्दांत निवेदन

या पार्श्वभूमीवर चेतन संतोषराव इंगोले सावता परिषद शहराध्यक्ष, वाशिम शहराच्या वतीने आज (दि. ३०/१/२०२६) जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात अतिक्रमण हटाव मोहिमेतील दुजाभाव थांबवावा आणि न्याय्य भूमिका घ्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

मुख्य मागण्या

बाधित लहान व्यावसायिकांना तातडीने पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी

नुकसानग्रस्त कुटुंबांचे योग्य पुनर्वसन करावे

आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना आर्थिक सहाय्य द्यावे भविष्यातील कारवायांपूर्वी पूर्वसूचना व समन्वय साधावा

अवैध अतिक्रमण करून उभारलेल्या पक्क्या बांधकामांवर तात्काळ कारवाई करावी. नगरपरिषद व प्रशासनाने संवेदनशीलता, सामाजिक न्याय आणि मानवतेच्या भूमिकेतून निर्णय घ्यावा, अन्यथा ही मोहीम 'सुशोभीकरण' न राहता 'गरीब हटाव' ठरेल, अशी तीव्र भावना शहरात व्यक्त होत आहे.

निवेदन देताना यावेळी उपस्थित

रवी खोटे, गणेश कांबळे, नितीन गाडेकर, प्रमोद गाडेकर, पठाण मामू, सुमनबाई अंभोरे, राधाबाई धवसे, चंद्रभागाबाई काळे, वैभव जंगले, प्रवीण पाटील, प्रशांत तायडे, दीपक पोरे, सुरेश आवटे, राहुल लबडे, सय्यद मोबिन, विठ्ठल जाधव, शिवा वाणी, श्रावण भालेराव, संतोष आठवले, सचिन खोटे, गणेश वाणी, मंगेश मापारी इतर भरपूर जण उपस्थित होते.

# वर्दीतली तपश्चर्या २४ वर्षांचा त्याग आणि देशासाठी समर्पित जीवन

करडा,तालुका रिसोड या छोट्याशा गावातून निघालेला एक तरुण जेव्हा भारतीय सेनेत दाखल झाला, तेव्हा त्याच्या पायात चप्पल होती, मनात स्वप्न होतं आणि छातीत देशप्रेमाची आग होती. त्या दिवशी त्याने केवळ नोकरी स्वीकारली नाही, तर आयुष्यभरासाठी भारतमातेच्या सेवेत स्वतःला अर्पण केलं. पुढील चोवीस वर्षे त्याने वर्दी ही केवळ अंगावर घातली नाही, तर ती आपल्या श्वासात, रक्तात आणि स्वभावात मिसळून घेतली. आज तो सेवानिवृत्त झाला आहे, पण त्याची देशसेवा संपलेली नाही, कारण सैनिकाची निष्ठा निवृत्तीनंतरही कायम असते. त्या निष्ठेचं नाव आहे — श्री. संतोष अब्बासाहेब राव देशमुख.




श्री. संतोष देशमुख यांनी भारतीय सेनेत तब्बल २४ वर्षे निष्ठेने, शौर्याने आणि प्रामाणिकपणे सेवा बजावली. बर्फाच्छादित पर्वत, अंग भाजून टाकणारी वाळवंटं, घनदाट जंगलं आणि धोक्यांनी भरलेल्या सीमारेषा—या सगळ्या ठिकाणी त्यांनी देशासाठी उभं राहून आपलं आयुष्य पणाला लावलं. सण, उत्सव, वाढदिवस, लेकरांचे पहिले पाऊल, आई-वडिलांची आजारी अवस्था— असं कितीतरी काही त्यांना गमवावं लागलं, पण प्रत्येक वेळी त्यांनी मनाला एकच उत्तर दिलं—देश आधी आणि मी नंतर. कारण त्यांच्या दृष्टीने भारतमाता हीच खरी आई होती.

करड्याच्या मातीत घडलेला हा जवान फक्त बंदूक हातात घेऊन उभा राहिला नाही, तर त्याने आपल्या आचरणातून गावाला अभिमान दिला. त्याचं आयुष्य म्हणजे त्याग, संयम आणि शिस्तीचा चालता-बोलता धडा आहे. मोठेपणासाठी मोठं शहर लागत नाही, मोठं मन लागतं, हे त्यांनी आपल्या आयुष्यातून दाखवून दिलं. आज करड्यासारखं छोटं गाव देशाच्या नकाशावर मोठं वाटतं, कारण तिथून एक असा माणूस घडला ज्याने चोवीस वर्षे आपलं आयुष्य देशासाठी दिलं. आपण आज शांत झोपतो, कारण कुणी तरी कधीच झोपत नाही. आपण सण साजरे करतो, कारण कुणी तरी सीमेवर सणाच्या रात्री बंदूक हातात घेऊन उभा असतो. आपण आपल्या मुलाला मिठी मारतो, तेव्हा कुणाचा तरी मुलगा आईच्या मिठीपासून हजारो किलोमीटर दूर उभा असतो. ही तुलना अस्वस्थ करणारी आहे, पण तीच आपल्याला जागं ठेवायला हवी. कारण देशप्रेम म्हणजे फक्त घोषणा नाही, ते रोजच्या आचरणात दिसायला हवं.

सैनिकासाठी सन्मान म्हणजे फक्त हार, फोटो, भाषण किंवा सोशल मीडियावरचा सॅल्यूट नाही; सैनिकासाठी सन्मान म्हणजे समाज शिस्तीत राहणं, नियम पाळणं, भ्रष्टाचार टाळणं, एकमेकांशी प्रामाणिक वागणं आणि देशाला आतून मजबूत करणं. जेव्हा आपण रस्त्यावर कचरा टाकत नाही, वाहतूक नियम पाळतो, कर वेळेवर भरतो आणि माणुसकी जपतो, तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने सैनिकांचा मान राखतो.३१ जानेवारी २०२६ रोजी श्री. संतोष अब्बासाहेब राव देशमुख हे भारतीय सेनेतून सन्मानपूर्वक सेवानिवृत्त झाले. वर्दी उतरली असली तरी त्यांची शपथ अजूनही जिवंत आहे. देशासाठी जगणं ही सवय बनलेली असते, ती सहज सुटत नाही. आता ते आपल्या गावात परतले आहेत, शेतीत हातभार लावत आहेत, तरुणांना प्रेरणा देत आहेत आणि आपल्या वागण्यातून अजूनही देशसेवेचा अर्थ शिकवत आहेत. ते सांगतात—देशासाठी काहीतरी करणं म्हणजे फक्त सीमेवर जाणं नाही, तर आपल्या गावात, घरात आणि समाजात प्रामाणिकपणा जपणं हाच खरा देशधर्म आहे.करड्याच्या मातीतून घडलेला हा जवान फक्त भूतकाळ नाही, तो आपला वर्तमान आहे आणि आपल्या भविष्यासाठीचा आदर्श आहे. त्यांच्या २४ वर्षांच्या राष्ट्रसेवेचा मान आपण शब्दात नाही, तर आचरणात दिला पाहिजे. कारण सैनिक निवृत्त होतो, पण त्याची निष्ठा कधीच निवृत्त होत नाही.

**करड्याचा अभिमान — देशाचा श्वास**

- नाव : श्री. संतोष अब्बासाहेब राव देशमुख
- गाव : करडा, ता. रिसोड
- सेवा कालावधी : २४ वर्षे – भारतीय सेना
- सेवानिवृत्ती : ३१ जानेवारी २०२६ (सन्मानपूर्वक)

संदेश : "देशासाठी काहीतरी करणं म्हणजे फक्त सीमेवर जाणं नाही, तर आपल्या गावात, घरात आणि समाजात प्रामाणिकपणा जपणं."

**शब्दलेखन...**
**करण धोंगडे वाशिम जिल्हा प्रतिनिधी दैनिक युवक आधार**

# संत रविदास व डॉ. आंबेडकरांचे विचार आजही दिशादर्शक – युवराज सोनवणे



**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी**

संत शिरोमणी रविदास महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशात समता, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे विचार आजही समाजासाठी दिशादर्शक आहेत, असे प्रतिपादन फुले–आंबेडकरी विचारांचे कृतिशील अभ्यासक व मुक्त पत्रकार युवराज सोनवणे यांनी केले.

ते शिरूर कासार येथे दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी संत शिरोमणी रविदास महाराज जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी चर्मकार महासंघाचे राज्य अध्यक्ष प्रा. बाळकृष्ण हंकारे उद्घाटक म्हणून, तर प्रा. राम गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

युवराज सोनवणे पुढे म्हणाले की, “समतेची लढाई भगवान बुद्धांपासून सुरू झाली. ती पुढे वारकरी व नाथ संप्रदायातील संतांनी पुढे नेली. या परंपरेतीलच एक महान संत म्हणजे संत रविदास महाराज.” संतांनी विषमतावादी जातीव्यवस्थेला कठोर शब्दांत आव्हान दिले; मात्र ती व्यवस्था मोडून काढण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा उभी करता आली नाही. हे अपूर्ण कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून पूर्ण केले, असे त्यांनी ठामपणे सांगितले.आज समाजात सर्वत्र भगवे वस्त्र धारण करणारे अनेकजण दिसतात; मात्र ते संत तर दूरच, साधूही नाहीत. बहुतेक जण संधीसाधू असून त्यांची खरी ओळख त्यांच्या संपत्ती व कृत्यांवरून स्पष्ट होते. अनेक तथाकथित संत तुरुंगात गेल्याची उदाहरणे आपण पाहिली आहेत, असा घणाघाती आरोपही सोनवणे यांनी केला.

कार्यक्रमात प्रा. बाळकृष्ण हंकारे, प्रा. राम गायकवाड, प्रा. श्रीराम जाधव, प्रा. भानुदास कंठाळे, प्रा. सुभाष गायकवाड तसेच शिवसेना (ठाकरे गट) तालुकाध्यक्ष सोपान मोरे यांनीही आपले विचार मांडले.

या कार्यक्रमास ॲड. शेषराव पाखरे, प्रा. जयेंद्र निकम, सखाराम गायकवाड, विठ्ठल सरवदे, प्रकाश सुतार, सुरेखा सुतार, बाळासाहेब धनवे, सुनील कांबळे, राजेंद्र गुजर, मनोहर औसारमल, काळू सरवदे, शहादेव शेलार, अनिल वाघमारे, बाळासाहेब इंगळे, गोकुळ नन्नवरे, योगेश नन्नवरे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संत रविदास महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविक जयंती उत्सव समितीचे मुख्य संयोजक छत्रपती नन्नवरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. जयेंद्र निकम यांनी केले.

# स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया ची धडाकेबाज कामगीरी

## मोटार सायकल चोरी करणारे ३ अट्टल आरोपी स्थानिक गुन्हे शाखा

**गोंदियाच्या जाळ्यात -**
**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड**
**प्रतिनिधी जिल्हा (गोंदिया )**

गोंदिया जिल्ह्यातील मोटार सायकल चोरीचे ६ गुन्हे व राजनांदगाव येथील १ गुन्हा उघड - आरोपीतांकडून चोरीचे ७ मोटारसायकल एकूण किमती ४,०५,०००/- रूपये जप्त

दिनांक ३०/०१/२०२६ रोजी मा. पोलीस अधिक्षक गोंदिया श्री. गोरख भामरे सर यांचे निर्देशाप्रमाणे व पोलीस निरीक्षक श्री पुरुषोत्तम अहेरकर , स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया येथील पोलीस पथक जिल्हा हद्दीत अउघड मोटार सायकल चोरीच्या गुन्हयातील आरोपी शोध व गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदार कडून माहिति प्राप्त झाली कि १) धीरज भूषण फुंडे वय ३५ वर्ष रा. कालीमाटी व त्याचे मित्र २) जयराम धर्मराज सेवईवर वय ४७ वर्ष रा. बालमटोला / दासगाव , ३) तेजराम उर्फ तेजस जगदीश आडे , वय ३० वर्ष रा. कोंढा कोसारा जि भंडारा ४) योगेंद्र मुरातलाल नागपुरे वय ४२ वर्ष रा. सोनबिहारी यांनी मिळून गोंदिया जिल्यातील व राजनांदगाव छत्तीसगड येथून मोटार सायकल चोरी करून योगेंद्र मुरतलाल नागपुरे वय ४२ वर्ष रा. सोनबिहारी यांचे कडे विक्री करण्याचे इराद्याने ठेवले आहेत. या खबरेवर स्थानिक गुन्हे शाखांचे पथकाने सापळा रचून १) धीरज भूषण फुंडे वय ३५ वर्ष रा. कालीमाटी २) जयराम धर्मराज सेवईवर वय ४७ वर्ष रा. बालमटोला / दासगाव , ३) योगेंद्र मुरातलाल नागपुरे वय ४२ वर्ष रा. सोनबिहारी यांना ताब्यात घेऊन मोटार सायकल चोरी संबंधाने सखोल विचारपूस केली असता त्यांनी सांगितले कि, चौघांनी मिळून दिनाक १९/०१/२०२५ रोजी सालेकसा येथून १ मोटर सायकल चोरी केल्याचे सांगितले



तसेच गोंदिया जिल्ह्यात मौजा कामठा , बिरसोला ,रेलटोली गोंदिया, आमगाव, गहिरीभेंडा जि . राजनांदगाव येथून मोटार सायकल चोरी केल्याचे सांगीतले. दिलेल्या माहितीनुसार तिन्ही आरोपीतांकडून खालीलप्रमाणे एकूण ७ मोटर सायकल हस्तगत करून जप्त करण्यात आलेले आहेत .

१) हिरो होंडा पॅशन प्रो मोटार सायकल अंदाजे किमती ५०,०००/- रुपये

२) हिरो एच एफ डीलक्स मोटार सायकल अंदाजे किमती ६०,०००/- रुपये

३) हिरो पॅशन प्रो मोटार सायकल अंदाजे किमती ५५,०००/- रुपये

४) हिरो सी. डी . डीलक्स मोटार सायकल अंदाजे किमती ६०,०००/- रुपये

५) होंडा साईन मोटार सायकल अंदाजे किमती ६०,०००/- रुपये

६) हिरो पॅशन प्रो मोटार सायकल अंदाजे किमती ७०,०००/- रुपये

७) हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटार सायकल किमती ५०,०००/-

असे एकूण ७ मोटर सायकल एकूण किमती ४,०५,०००/- रुपयाचे जप्त करण्यात आलेले आहेत.

वरील जप्त करण्यात आलेले मोटर सायकल बाबत गुन्हे अभिलेख तपासण्यात आले असता हे गोंदिया जिल्ह्याचे पोलीस स्टेशन सालेकसा येथील २ गुन्हे , पोलीस स्टेशन आमगाव येथील १ गुन्हा , रावणवाडी येथील २ गुन्हे, पोलीस स्टेशन रामनगर येथील १ गुन्हा असे गोंदिया जिल्ह्यातील मोटार सायकल चोरीचे एकूण ६ गुन्हे व राजनांदगाव जिल्ह्यातील १ गुन्हा असे एकूण ७ गुन्हे स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया यांनी उघडकीस आणला आहे.

तिन्ही आरोपीताना मुद्देमाल सह पोलीस स्टेशन सालेकसा येथे पुढील तपास कामी स्वाधीन करण्यात आले आहे.

सदरची कामगीरी श्री. गोरख भामरे, पोलीस अधिक्षक, गोंदिया, स्थानिक गुन्हे शाखा गोंदियाचे पोलीस निरीक्षक श्री पुरुषोत्तम अहेरकर यांचे मार्गदर्शनात पोहवा विठठल ठाकरे , सुबोध बिसेन, इंद्रजित बिसेन, संजय चौहान , दीक्षितकुमार दमाहे , भोजराज बहेकार , रियाज शेख, राजकुमार खोटेले , भुवनलाल देशमुख, पो. शि . छगन विठ्ठले, हंसराज भांडारकर, दुर्गेश पाटील, चापोशि कुंभलवार , राम खंदारे यांनी केली आहे.

# भंडाऱ्याच्या उधळणीसह निफाडला श्री खंडेराव महाराज यात्रा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

**निफाड** परिसराचे आराध्य दैवत श्री खंडेराव महाराज यांची वार्षिक यात्रा उत्सव सालाबादप्रमाणे याही वर्षी मोठ्या भक्तिभावात व उत्साहात पार पडला. भंडाऱ्याची उधळण करत “येळकोट येळकोट जय मल्हार” च्या गजरात ही यात्रा संपन्न झाली.दिनांक १ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.३० वाजता श्री खंडेराव महाराज मंदिरात होम-हवन करण्यात आले. त्यानंतर सकाळी ८ वाजता शनी मंदिरापासून मांडव व डहाळ्यांची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. सकाळी ९ वाजता श्री खंडेराव महाराजांच्या पादुकांपासून निफाड न्यायालयाच्या मागील मार्गाने कावडीची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

दुपारी २ वाजता कचेश्वर जानकीराम दुसाने यांच्या निवासस्थानापासून दैवतांचे पूजन सुरू झाले. दुपारी ३ वाजता श्री मारुती मंदिर व शनी चौक येथे होम-हवन पार पडले. दुपारी ४.३० वाजता बाळासाहेब भानुदास लोखंडे यांच्या जाणूस घरी भागवत बाबांच्या स्नानाचा धार्मिक विधी संपन्न झाला.

सायंकाळी भंडाऱ्याची उधळण करत येळकोट येळकोट जय मल्हार च्या जयघोषात श्री खंडोबा रायाची महाआरती मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. सायंकाळी ६.३० वाजता रथ व बारा गाड्या





ओढण्याचा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात पार पडला. या कार्यक्रमाचे मानकरी नंदूभाऊ रमेश शेलार होते. यावेळी संपूर्ण छत्रपती शिवाजी महाराज चौक भाविकांच्या गर्दीने फुलून गेला होता.

या यात्रेत यात्रा कमिटीचे अध्यक्ष व उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, खजिनदार सुभाष कर्डिले, उपाध्यक्ष संदीप गाजरे, निफाड नगरपंचायतीचे नगरसेवक-नगरसेविका, कर्मचारी वृंद तसेच निफाड ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेवदंडा प्रकरणी ४८ तासांत खुन्यांना अटक; पोलिसांचे जलद तपास कौतुकास्पद

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी**

रेवदंडा पोलिस स्टेशन हद्दीतील चौल टेकाळकर आळी येथे २८ जानेवारी रोजी दुपारी ९.३० च्या आधी वृद्ध महिलेच्या क्रूर खूनाची घटना घडली. स्थानिक गुन्हे शाखेच्या तांत्रिक विश्लेषण आणि कौशल्यपूर्ण तपासाने केवळ ४८ तासांत चार आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले. या घटनेमुळे चौल-रेवदंडा परिसरातील नागरिकांमध्ये पोलिसांच्या सतर्कतेमुळे समाधान व्यक्त होत असून, त्यांचे जोरदार कौतुक केले जात आहे. नागरिकांनी अनोळखी (गावाबाहेरील) व्यक्तींच्या हालचालींबाबत पोलिसांना तात्काळ माहिती देण्याचे आवाहनही केले आहे. घटनेचे तपशीलदि. २८/०१/२०२६ रोजी सकाळी ९.३० च्या आधी टेकाळकर आळी, चौल, ता. अलिबाग येथील मंदा प्रमोद म्हात्रे (वय ७०) या वृद्ध महिलेच्या घरी घुसखोरी करून त्यांनी तिचा जिवलगवा मारला आणि अंगावरील सोन्याचे दागिने जबरी चोरीने नेली. मंदा एकटीच राहत होत्या, असा फायदा घेऊन ही घटना उघडकीस आली. दि. २९/०१/२०२६ रोजी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.पोलिसांचे जलद तपासकार्य रायगड पोलिसांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेची पथके रवाना केली. मार्गदर्शन श्रीमती आँचल




दलाल (भापोसे पोलीस अधीक्षक, रायगड), श्री. अभिजीत शिवथरे (अपर पोलीस अधीक्षक), श्रीमती माया मोरे (उपविभागीय पोलीस अधिकारी, अलिबाग) आणि श्री. मिलिंद खोपडे (पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा) यांचे झाले.कारवाई पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, पोलिस कर्मचारी अमोल हंबीर, अमोल म्हात्रे, अक्षय पाटील; स्थानिक गुन्हे शाखेतील सहाय्यक पीआय मानसिंग पाटील, रवि मुंडे, शरद फरांदे, विनोद पाटील, तुषार घरत (सायबर); तसेच रेवदंडा पो. ठाण्यातील सहाय्यक पीआय भैरु जाधव आणि कर्मचारी रुपेश निगडे, सचिन वावेकर, प्रशांत लोहार, प्रदिप खरात यांचा समावेश होता.पथकांनी तांत्रिक विश्लेषण, चौकशी आणि ट्रॅकिंगद्वारे आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणाहून पकडले:महादेव ऊर्फ शिवा राधाकिसन ढोबळे (२५, रा. जाटदेवळा, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर) यास आष्टी (जि. बीड) येथून.अशोक अजिनाथ भोसले (१९, रा. जाटदेवळा, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर) आणि गणेश उत्तम पंडागळे (२५, रा. जाटदेवळा, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर) यांना जाटदेवळा येथून.शुभम एकनाथ पवार (२३, रा. माणिकदवंडी, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर) यास पेण (जि. रायगड) येथून.प्राथमिक तपासात महादेव ढोबळे हा मयत महिलेचा जावई असल्याचे उघड झाले. चोरीचे दागिने आणि खूनाचे नेमके कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.नागरिकांचे पोलिसांवर कौतुक आणि आवाहनया जलद कारवाईमुळे रेवदंडा आणि चौल परिसरातील नागरिकांनी पोलिसांचे अभिनंदन केले. "४८ तासांत गुन्हा उघड करणे ही खरी सतर्कता आहे. ज्येष्ठ महिलांच्या सुरक्षेसाठी पोलिसांची मेहनत दाखवणारी बाब," असे स्थानिक ग्रामस्थ ॲड विनोद नाईक यांनी सांगितले. नागरिकांनी अनोळखी लोक (गावाबाहेरील व्यक्ती) चौल-रेवदंडा परिसरात फिरताना दिसल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन केले. "अशा संशयास्पद हालचालींबाबत पोलिसांना सांगितल्यास गुन्हे टाळता येतील आणि पोलिसांना मदत होईल," असे ग्रामस्थ संदीप म्हात्रे यांनी सांगितले. तसेच, भविष्यात अशा घटनांना पायाभूत रोखण्याची मागणी केली. रेवदंडा पो. ठाण्याचे सपोनी भैरु जाधव हे पुढील तपास करीत असून, हे प्रकरण रायगड पोलिसांच्या कुशलतेचे उदाहरण ठरले आहे.

# नवी मुंबई महापालिकेत गणेश नाईकांचा धक्कादायक महापौर व उपमहापौर निवडीचा निर्णय

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे/प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर दोन हात करत नवी मुंबई महापालिकेत भाजपला एकहाती सत्ता मिळवून देण्यात निर्णायक भूमिका बजावणारे वनमंत्री गणेश नाईक यांनी महापौर व उपमहापौर निवडीत सर्वांचे अंदाज चुकवत धक्कातंत्राचा प्रयोग अंमलात आणला.महापौर पदाच्या स्पर्धेत आघाडीवर असलेल्या नावांना बाजूला सारत नाईक यांनी नेरुळ लगतच्या सारसोळे गावातील कट्टर समर्थक सुरज पाटील यांच्या पत्नी नगरसेविका सुजाता पाटील यांची या पदावर निवड केली. अभ्यासू व आक्रमक प्रतिमेचे सुरज हे नाईक कुटुंबाचे निष्ठावान योद्धे



म्हणून ओळखले जातात. भाजपची नवी मुंबईतील तरुण चेहरा असलेल्या सुरज यांच्या निवडीने ग्रामीण-शहरी समतोलही साधण्यात आला आहे.चुरशीची निवडणूक, भाजपची भरीव सरशीनवी मुंबई महापालिकेची यंदाची निवडणूक अतिशय चुरशीची ठरली. वनमंत्री गणेश नाईक व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील सत्तासंघर्षामुळे ही लढत संपूर्ण महाराष्ट्रात गाजली. आक्रमक प्रचाराने भाजपला शहरावर एकहाती पकड मिळवून दिली.१११ जागांच्या महापालिकेत भाजपचे ६५ व १ अपक्ष नगरसेवक मिळून (६६) व शिंदे गटाच्या शिवसेनेचे ४२ नगरसेवक निवडून आले. बहुमताचा ५६ चा आकडा भाजपने सहज ओलांडला. विशेष म्हणजे, ६५ पैकी बहुसंख्य नगरसेवक हे वनमंत्री गणेश नाईक यांचे कट्टर समर्थक असल्याने महापालिकेवर नाईक यांची मजबूत पकड झाली आहे. आरक्षणामुळे सागर नाईक बाहेर, इतरही अपेक्षित नावे बाजूला महापौर पद महिलांसाठी राखीव असल्याने गणेश नाईक यांचे पुतणे व माजी महापौर सागर नाईक हे स्पर्धेतून बाहेर पडले. महापालिका कामकाजात पारंगत असलेल्या माजी महापौर व नगरसेवक सागर नाईक यांची उमेदवारी अपेक्षित होती, पण आरक्षणाचा फटका बसला. दरम्यान, ज्येष्ठ नगरसेविका नेत्रा शिर्के (पूर्व स्थायी समिती अध्यक्ष), माधुरी सुतार (भाजप महिला जिल्हाध्यक्षा) व तुर्भेतील शुभांगी पाटील अशी नावे चर्चेत होती.असे असताना मंत्री गणेश नाईक यांनी सुरज पाटील यांच्या पत्नी सुजाता पाटील यांची महापौर म्हणून निवड करत सर्वांनाच धक्का दिला. २०१० मध्ये पहिल्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आलेले सुरज हे तरुण, अभ्यासू नेते म्हणून प्रसिद्ध आहेत. यंदा प्रभाग गाव-शहरी भागात विभागला असतानाही सुरज व सुजाता पाटील दांपत्याने मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला. २०१५ मध्ये पहिल्यांदा निवडून आलेल्या सुजाता पाटील यांना स्वीकृत नगरसेवक पद मिळाले होते. सलग दोन वेळा विजयी झालेल्या सुजाता यांना महापौरपद देत मंत्री गणेश नाईक यांनी नव्या चेहऱ्याला प्रोत्साहन दिले आहे. उपमहापौरपदी दशरथ भगतांची निवड; नाईकांची पकड आणखी घट्टयाचबरोबर उपमहापौर पदासाठीही गणेश नाईक यांचा प्रभाव दिसला. निष्ठावान समर्थक दशरथ भगत यांची उपमहापौरपदी निवड करण्यात आली असून, यामुळे नवी मुंबई महापालिकेवरील मंत्री गणेश नाईक यांची सत्ता पूर्णपणे मजबूत झाली आहे.

# उद्योजक होण्यासाठी कौशल्य विकास आवश्यक! :- प्रा.डॉ.मनोजकुमार नवसे

## जय भवानीत उद्योजकता विकासावर कार्यशाळा संपन्न...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

- उद्योजक होण्यासाठी युवकामध्ये कौशल्य विकासाची आवश्यकता आहे! असे प्रतिपादन प्रा. डॉ.मनोज कुमार नवसे यांनी केले. पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, विद्यार्थी विकास विभाग आणि कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा, लोकप्रशासन विभाग, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजकता विकास कार्यशाळेत "कौशल्य विकास" या विषयावर बंकटस्वामी महाविद्यालय, बीड येथील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.मनोज कुमार नवसे यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत प्रमुख वक्त्यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक काळातील उद्योजकतेसाठी आवश्यक असलेल्या विविध कौशल्यांबाबत सविस्तर माहिती दिली. वक्त्यांनी आपल्या भाषणात संवाद कौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता,



निर्णयक्षमता, नेतृत्वगुण तसेच तांत्रिक कौशल्ये यांचे महत्त्व अधोरेखित केले. केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून प्रत्यक्ष अनुभव, नाविन्यपूर्ण विचार आणि सातत्यपूर्ण कौशल्य विकास या मुळेच यशस्वी उद्योजक घडतो, असे त्यांनी सांगितले. आजच्या स्पर्धात्मक युगात स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असून तरुणांनी त्या ओळखून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ही केले. सदरील कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकते संदर्भात सकारात्मक व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. या सत्राचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.शिवाजी काकडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.कल्पना हनुमंत घारगे यांनी केले.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर जनसंपर्क विभाग

## आदिवासी इतिहास संग्रहालय कोनशिलेचे अनावरण | विदर्भातील आदिवासी संस्कृतीचे विद्यापीठात होणार जतन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर**

**नागपूर : (३१-१-२०२६)** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आदिवासी इतिहास संग्रहालयाच्या कोनशिलेचे अनावरण माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या शुभहस्ते शनिवार दि, ३१ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले. महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरात निर्माण होत असलेल्या आदिवासी इतिहास संग्रहालयामुळे विदर्भातील आदिवासी संस्कृतीचे जतन विद्यापीठाच्या माध्यमातून होणार आहे.विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्व विभागाजवळ निर्माणाधीन संग्रहालय परिसरात आयोजित कार्यक्रमाला माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या समवेत कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. मेधा कानेटकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. उमेश पलीकुंडवार, अधिसभा सदस्य श्री. दिनेश शेराम, श्री. प्रथमेश फुलेकर, पीएम उषा समन्वयक डॉ. रुपेश बडेरे, प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्व विभाग प्रमुख डॉ. प्रबास साहू, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वंदना धुर्वे, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख डॉ. समित माहोरे, विद्यापीठ अभियंता श्री.



विनोद इलमे, व्यवसाय व व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. राहुल खराबे, उद्यान अधीक्षक श्री. प्रवीण गोतमारे, द्वारका कन्स्ट्रक्शनचे श्री. द्वारकाजी मेघनानी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री. मिलिंद राईकवार यांच्यासह अन्य उपस्थित होते. \शताब्दी महोत्सवी वर्षात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला महाराष्ट्र शासनाकडून १०० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. या निधीमधून पीएम उषाच्या सहकार्यातून विद्यापीठ परिसरात आदिवासी इतिहास संग्रहालयाची निर्मिती होत आहे. एकूण ४.४३ कोटी रुपये खर्चून उभ्या होत असलेल्या संग्रहालयात आदिवासी समुदयाचा इतिहास संपूर्ण जगाला बघावयास मिळणार आहे. विदर्भामध्ये एकूण जनसमुदायाच्या २३ टक्के लोकसंख्या आदिवासी समाजाची आहे. यामध्ये प्रामुख्याने गोंड, कोलम, माडिया, मेळघाटातील कोरुकू आदी आदिवासी जमातीचा समावेश आहे. मोठ्या संख्येने असलेल्या आदिवासी समाजातील चालीरीती, परंपरा, संस्कृती, जनजीवन या संग्रहालयाच्या माध्यमातून दर्शविले जाणार आहे. विदर्भातील आदिवासी समाजाची संस्कृती जनमानसांपर्यंत पोहोचवण्याचे गौरवास्पद कार्य संग्रहालयाच्या माध्यमातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ करणार आहे. पदव्युत्तर इतिहास विभाग यांच्या प्रस्तावाला पीएम उषा अंतर्गत मान्यता मिळाल्याने विभाग प्रमुख डॉ. शामराव कोरेटी यांच्या प्रयत्नाला यश मिळाले आहे. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी यावेळी आदिवासी इतिहास संग्रहालयाच्या बांधकाम परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांनी संग्रहालयाबाबत संपूर्ण माहिती जाणून घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी केले. संचालन इतिहास विभागातील प्रा. रामभाऊ कोरेकर यांनी केले. यावेळी विविध शैक्षणिक विभागांचे प्रमुख शिक्षक कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**पुरातत्व संग्रहालयाची पाहणी**

प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्व विभागाला भेट देत माननीय कुलगुरू डॉ. मनाली सिरसागर यांनी पुरातत्व संग्रहालयाची पाहणी केली. विद्यापीठाच्या विभागाने विदर्भातील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक तसेच पुरातत्व वारसा असलेल्या वस्तूंचे संग्रहालयात जतन केल्याने त्यांनी विभागाचे कौतुक केले. यावेळी संग्रहालयातील पुरातत्व वस्तूंची माहिती विभाग प्रमुख डॉ. प्रबास साहू यांनी कुलगुरू महोदयांना दिली.

# ग्रो कॅपिटल आर्थिक फसवणूक प्रकरण

## अपर्णा दुधेचा अटकपूर्व जामीन फेटाळला, तर मंदार दुधे गजाआड!

**दैनिक युवक आधार**
**दिग्रस प्रतिनिधी**
**उमेश साखरकर**

**दिग्रस :** ग्रो-कॅपिटल आर्थिक फसवणूक प्रकरणात तपास कार्याने गती घेतली असून मुख्य सूत्रधारांपैकी एक असलेल्या फरार संशयित आरोपी मंदार गिरीश दुधे याला अटक करण्यात पुसद पोलिसांना यश आले आहे. तर दुसरी फरार आरोपी अपर्णा विनोदकुमार दुधे हिचा अटकपूर्व जामीन दारव्हा सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे.

अटकेतील आरोपी विनोदकुमार दुधे याची अपर्णा ही पत्नी असून मंदार हा मुख्य सूत्रधार गिरीश दुधे याचा मुलगा आहे.

दोन दिवसांपूर्वी पुसद पोलिसांनी दिग्रस येथील आरोपींच्या आणि नातेवाईकांच्या घरी धाड टाकली असता मंदार दुधे याला त्याच्या राहत्या घरून अटक करण्यात आली. अपर्णाच्या माहेरी टाकलेल्या धाडीत मात्र ती सापडली नाही. काल मंदारला दारव्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने मंदार दुधे याला ५ फेब्रुवारी



मंदार दुधे याच्या नावाने अल्फा एक्सिम कंपनी नोंदविण्यात आली असून नोव्हेंबर 2024 पासूनच कंपनीने आपला कागदोपत्री व्यवहार सुरू केला होता. कंपनीच्या बँक खात्यातून आर्थिक व्यवहार चालत होता. बँकेतील त्याच्या खात्यातून लाखोंची आर्थिक उलाढाल झालेली आहे. अनेक गुंतवणूकदारांनी या खात्यात थेट गुंतवणूक केली असून त्यातून काही गुंतवणूक दारांना परतावा सुद्धा देण्यात आला आहे. शिवाय या खात्याचे धनादेश सुद्धा त्याने गुंतवणूकदारांना जामीन म्हणून दिल्याचे समोर आले आहे.

२०२६ पर्यंत सहा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सध्या त्याला तपास कामी पुसद पोलिसांच्याच ताब्यात ठेवण्यात आले आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी जे यांच्याकडे पोलिस अधिक्षकांनी हा तपास सोपविला असून त्यांच्या मार्गदर्शनात तपास कार्य वेगाने सुरू आहे.

यापूर्वी गिरीश दुधे व विनोद दुधे या दोन भावांना अटक करून न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आलेले आहे. त्यानंतरही चार आरोपी फरार होते. मात्र आता एकामागून एक कारवाई सुरू झाल्याने गुंतवणूकदारांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.सुमारे ७ कोटींपेक्षा अधिक रकमेच्या फसवणुकीत अडकलेल्या ३७ हून अधिक शिक्षक व नागरिकांच्या दृष्टीने ही मोठी घडामोड मानली जात आहे. मंदार दुधे हा अल्फा एक्सिम कंपनीचा मालक असून गुंतवणुक रकमेच्या व्यवहारात सक्रिय असल्याचे थेट पुरावे तपासात समोर आले आहेत. त्याच्या अल्फा एक्सिम कंपनीच्या बँक खात्यात लाखो रुपयांची उलाढाल झालेली आहे. त्यामुळे त्याच्या अटकेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

दुसरी फरार आरोपी अपर्णा दुधे हिचा अटकपूर्व जामीन दारव्हा सत्र न्यायालयाने फेटाळल्यामुळे आता तिच्यावरही अटकेची टांगती तलवार असून, पुढील काही दिवसांत पोलिसांकडून आणखी धडक कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दरम्यान, या प्रकरणातील इतर फरार आरोपी ग्रो कॅपिटल कंपनीचा मालक मनोज उर्फ विश्वास पाटील आणि विश्वांजली व्हेंचर्स कंपनीची मालक पुष्पांजली रंधेरिया यांचाही शोध युद्धपातळीवर सुरू असून, लवकरच त्यांनाही गजाआड करण्यात येईल, असा विश्वास तपास यंत्रणेकडून व्यक्त करण्यात आला आहे. बुडालेल्या पैशांच्या वसुलीसाठी पोलिस काय पाऊल उचलतात याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दारू, वेग आणि बेफिकिरीचा कहर; श्रीवर्धन तालुक्यात अपघातसत्राची तिसरी भीषण घटना

## एकाचा जागीच मृत्यू, एक गंभीर जखमी — प्रशासनासाठी गंभीर इशारा..

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी**
**-अनिकेत मोहित**

श्रीवर्धन तालुक्यात रस्ते अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसून, दारू पिऊन वाहन चालविण्याच्या निष्काळजीपणामुळे पुन्हा एक निष्पाप नागरिकाचा जीव गेला आहे. काही दिवसांपूर्वी श्रीवर्धन येथे एका नामवंत व्यक्तीचा अपघाती मृत्यू, त्यानंतर हरिहरेश्वर येथे महिलेचा बळी, आणि आता दिवेआगर येथे घडलेली ही तिसरी भीषण घटना — तालुक्यातील अपघातसत्र अधिकच भयावह बनले आहे.

३१ जानेवारी रोजी दुपारी सुमारे १ वाजता दिवेआगर गावच्या हद्दीत माऊली हॉटेलजवळ हा भीषण अपघात झाला. फिर्यादी खलील मोहिद्दीन दाते (वय ६५, रा. करलास, ता. श्रीवर्धन) यांचे मावस भाऊ महमद हानीफ मुझफ्फर अर्जबेगी (वय ५३) व वहिणी सिमीन महमद हानीफ अर्जबेगी (वय ४५) हे मोटारसायकलवरून शेखाडी–दिवेआगर–बोर्ली मार्गे घरी जात असताना, दिवेआगर बाजूकडून येणाऱ्या कारने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली.

प्राथमिक तपासात कारचालक ऋषीकेश बाळासाहेब जोध (वय १९, रा. बाणेर, पुणे) हा दारूच्या नशेत, अतिवेगाने व बेदरकारपणे वाहन चालवत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या धडकेत महमद अर्जबेगी



यांच्या डोके, चेहरा व हात-पायांना गंभीर दुखापती होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला, तर सिमीन अर्जबेगी या गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी दिघी सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे हे वरिष्ठांच्या आदेशानुसार करीत आहेत.

बाहेरून येणाऱ्या वाहनचालकांची बेफिकिरी — प्रशासनासाठी इशारा

विशेष म्हणजे, आरोपी चालक पुणे जिल्ह्यातील असल्याने पर्यटनासाठी येणाऱ्या बाहेरच्या वाहनचालकांची बेफिकिरी ही श्रीवर्धन तालुक्यासाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. श्रीवर्धन, हरिहरेश्वर व दिवेआगरसारख्या पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या भागांत वारंवार घडणाऱ्या अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**प्रश्न उपस्थित: आणखी किती जीव गेल्यावर कारवाई?**

ही तिसरी गंभीर घटना असून, "आणखी किती जीव गेल्यावर प्रशासन जागे होणार?" असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

दारू पिऊन वाहन चालविणाऱ्यांवर शून्य सहनशीलता धोरण, पर्यटन मार्गांवर रात्रीचे विशेष नाकाबंदी अभियान, वेगमर्यादा उल्लंघनावर सीसीटीव्हीच्या माध्यमातून तात्काळ दंडात्मक कारवाई, तसेच बाहेरून येणाऱ्या वाहनांवर विशेष लक्ष ठेवण्याची जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

वरिष्ठ पातळीवरून तातडीने ठोस निर्णय व प्रभावी उपाययोजना राबविल्या नाहीत, तर अशा अपघातांची संख्या वाढून निष्पाप लोकांचा जीव जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# लोकसेवेचा ध्यास, माणुसकीचा श्वास आणि संघर्षातून उभा राहिलेला नेता :— आमदार सुरेश आण्णा धस

**दैनिक युवक आधार**
**शेख महेशर ताहेर, पाटोदा**

आजच्या काळात राजकारणाकडे अनेक जण सत्तेचा मार्ग, प्रतिष्ठा किंवा स्वार्थ साधण्याचे साधन म्हणून पाहतात. मात्र काही मोजक्या व्यक्ती अशा असतात ज्या राजकारणाला समाजसेवेचे प्रभावी माध्यम मानतात. आमदार सुरेश आण्णा धस हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना त्यांनी नेहमीच सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवले आहे. म्हणूनच जनता त्यांच्याकडे केवळ आमदार म्हणून नाही, तर खऱ्या अर्थाने समाजसेवक म्हणून पाहते. आमदार सुरेश आण्णा धस यांचा जनतेशी असलेला संबंध औपचारिक नाही, तर तो पूर्णपणे माणुसकीवर आधारित आहे. गावातील शेतकऱ्यापासून ते शहरातील गरजू नागरिकांपर्यंत प्रत्येकाच्या अडचणी ते आपुलकीने ऐकून घेतात. कुणाला आजारपणासाठी मदत लागो, कुणाला शिक्षणासाठी आधार हवा असो किंवा एखाद्या कुटुंबावर अचानक संकट ओढवले असो आ.सुरेश आण्णा धस शक्य तितक्या लवकर मदतीसाठी पुढे येतात.

शेतकरी हा समाजाचा कणा आहे, ही ठाम जाणीव ठेवून आमदार सुरेश



आण्णा धस यांनी कायम शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले आहे. पाणी टंचाई, वीज पुरवठा, पीक नुकसान, नुकसान भरपाई, कर्जाचा ताण अशा अनेक गंभीर समस्यांवर त्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. केवळ आश्वासन देऊन थांबणे नव्हे, तर प्रत्यक्ष काम करून प्रश्न सोडवण्यावर त्यांचा भर असतो. त्यामुळे शेतकरी वर्गात आमदार सुरेश आण्णा धस यांच्या बद्दल विशेष विश्वास निर्माण झाला आहे.

युवक आणि विद्यार्थ्यांबाबतही आमदार सुरेश आण्णा धस यांची भूमिका कायम सकारात्मक आणि प्रेरणादायी राहिली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करणे, तरुणांना रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन देणे आणि समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची प्रेरणा देणे हे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अनेक तरुणांना योग्य दिशा मिळाली असून, अनेकांचे आयुष्य घडले आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे आमदार सुरेश आण्णा धस यांनी दिव्यांग व्यक्तींच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी घेतलेली ठाम भूमिका. दिव्यांगांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली संजय गांधी निराधार योजना अंतर्गत मिळणारे मानधन अपुरे असल्याचे लक्षात घेऊन, आमदार सुरेश आण्णा धस यांनी विधानसभेत या योजनेत तीन हजार रुपये मानधन देण्यात यावे अशी ठोस मागणी मांडली होती. त्यांच्या या मागणीला यश आले आणि आज अनेक दिव्यांग व्यक्तींना दरमहा तीन हजार रुपये मानधन मिळत आहे. ही केवळ आर्थिक मदत नसून, दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने जगण्यासाठी दिलेला मोठा आधार आहे. आमदार सुरेश आण्णा धस यांचे कार्य कधी ही प्रसिद्धीसाठी नसते. अनेक वेळा त्यांनी केलेली मदत कुठेही झळकत नाही, परंतु ज्यांना मदत मिळते त्यांच्या आयुष्यात मोठा फरक पडतो. सत्ता, पद किंवा नाव यापेक्षा माणुसकी, संवेदनशीलता आणि सेवा हेच त्यांच्या कार्याचे खरे उद्दिष्ट आहे. म्हणूनच आज जनतेच्या नजरेत आ.सुरेश आण्णा धस केवळ आमदार नाहीत, तर आपल्या सुख-दुःखात धावून येणारा, आधार देणारा आपला माणूस आहेत. जनतेच्या विश्वासावर खरे उतरून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय व मदत पोहोचवणारे आमदार सुरेश आण्णा धस हे खऱ्या अर्थाने समाजसेवक आहेत. आमदार सुरेश आण्णा धस यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...! आपण सदैव निरोगी राहा, दीर्घायुष्य लाभो आणि समाजातील गोरगरीब, शेतकरी, युवक व दिव्यांगांसाठी आपले लोकाभिमुख व माणुसकीचे कार्य असेच अखंड सुरू राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा...!**

**लेखक :- जिलानी शेख**

# वायू व ध्वनी प्रदूषणाबाबत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांवर पनवेल महापालिकेकडून कठोर कारवाई ; 34 प्रकल्पांवरील बांधकामांना स्थगिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार तसेच पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिका हद्दीतील बांधकाम प्रकल्पांवर वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण व पर्यावरणीय नियमांच्या उल्लंघनाबाबत व्यापक तपासणी करून कारवाई करण्यात आली. स्थळपाहणी अहवालानुसार एकूण 34 बांधकामस्थळांवर कठोर कारवाई करण्यात आली असून सदर प्रकल्पांचे काम तात्काळ थांबविण्यात आले आहे.

यापूर्वी महापालिकेच्या वतीने एकूण 169 बांधकाम प्रकल्पांना / स्थळांना उपाययोजना करणेबाबत अथवा काम बंद करणेबाबत इशारावजा जाहीर नोटीस देण्यात आलेली होती. संबंधित बांधकाम व्यावसायिकांना नोटीसा बजावण्यात आल्यानंतरही काही व्यवसायिकांनी अपेक्षित कार्यवाही न केल्याचे दिसून आले. त्यानंतर महानगरपालिकेच्या पथकाने पुन्हा एकदा प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी केली. तपासणीदरम्यान अनेक ठिकाणी धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना न करणे, बांधकाम साहित्य खुले ठेवणे, बांधकामाच्या ठिकाणी प्रदूषण करणाऱ्या साहित्यावर नियमाप्रमाने पाणी न शिंपडणे, वाहन स्वच्छता न करणे, तसेच ब्लास्टिंग करतानाच्या मानक कार्यपद्धती (डजझ) चे पालन न करणे आदी गंभीर बाबी निर्दशनास आल्या.

या अनुषंगाने खालीलप्रमाणे विभागनिहाय कारवाई करण्यात आली -

कळंबोली विभाग - 10 बांधकाम प्रकल्प

कामोठे विभाग - 09 बांधकाम प्रकल्प

नवीन पनवेल / पनवेल विभाग - 15 बांधकाम प्रकल्प

एकूण : 34 बांधकाम प्रकल्पांवर कारवाई

सदर कारवाईदरम्यान संबंधितांना तात्काळ सुधारात्मक उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन सुरूच राहिल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

नागरिकांचे आरोग्य, स्वच्छ हवा व पर्यावरण संरक्षण याबाबत पनवेल महानगरपालिका कटिबद्ध असून, यापुढेही अशा प्रकारच्या तपासण्या व कारवाई नियमितपणे सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



# खोपटा येथे महाविकास आघाडीच्या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## महाविकास आघाडीचे उमेदवार पाच हजारांची आघाडी घेणार : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**
**उलवे, प्रतिनिधी**

: उरण पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत स्वतः मैदानात उतरले आहेत. खोपटा येथे महाविकास आघाडीच्या प्रचारासाठी महेंद्रशेठ घरत यांच्या नेतृत्वाखाली भव्य रॅली काढण्यात आली. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "महाविकास आघाडीचे उमेदवार बहुमतांनी निवडून येतील. किमान ५ हजारांची आघाडी मिळेल. कारण गावागावांत महाविकास आघाडीचाच बोलबाला आहे. आमचे उमेदवार सर्वसामान्यांचा आदर करणारे आहेत. मतदारांचा विश्वास ते सार्थ ठरवतील. त्यामुळे मतदारांनी महाविकास आघाडीच्याच उमेदवारांना मतदान करावे."

यावेळी माजी आमदार मनोहर भोईर,

उरण नगर पालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष भावना घाणेकर, काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, डॉ. मनीष पाटील, ॲड. अविनाश ठाकूर, अलंकार परदेशी, संतोष ठाकूर, घनश्याम पाटील, बबन कांबळे, सुरेश पाटील, रमाकांत पाटील, बी. एन. डाकी, प्रमोद म्हात्रे, योगेश पाटील, मनोहर म्हात्रे, तसेच महाविकास आघाडीचे कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.



# जि.प. शाळा गुगुळपिंपरी येथे राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परीक्षेचे आयोजन.

**दैनिक युवक आधार**
**| हिंगोली प्रतिनिधी**
**: प्रशांत टाकसाळ**

**गुगुळपिंपरी :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे तसेच स्पर्धात्मक आव्हाने पेलण्याची क्षमता विकसित व्हावी, या उद्देशाने राज्यस्तरीय मंथन सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा आज दि. १ फेब्रुवारी २०२६, रविवार रोजी उत्साहात पार पडली.



या परीक्षेसाठी जि.प. प्राथमिक शाळा गुगुळपिंपरी येथे परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले होते.

सकाळपासूनच विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत होते.

परीक्षेसाठी आवश्यक सर्व सुविधा केंद्रावर उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

विद्यार्थ्यांच्या बसण्याची योग्य व्यवस्था करण्यात आली होती.

परीक्षा नियोजित वेळेनुसार शांत व शिस्तबद्ध वातावरणात घेण्यात आली.

गुगुळपिंपरी येथील ७२ विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला.

जि.प. प्रा. शाळा मन्नासपिंपरी येथील ५ विद्यार्थी उपस्थित होते.

तसेच जि.प. प्रा. शाळा हिवरा येथील १७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

एकूण ९४ परीक्षार्थींनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानात भर घालणारी ठरत आहे.

स्पर्धात्मक परीक्षांची ओळख लहान वयात व्हावी हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी अशा स्पर्धा महत्त्वाच्या असल्याचे मत शिक्षकांनी व्यक्त केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या स्पर्धांसाठी तयार करण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगण्यात आले.

परीक्षा केंद्र संचालक श्री. पोहकर सर यांनी संपूर्ण नियोजन केले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा सुरळीत पार पडली.

सर्व शिक्षकांनी जबाबदाऱ्या पार पाडत सहकार्य केले.

कर्मचारी वर्गानेही व्यवस्थापनात सक्रिय सहभाग घेतला.

पालकांनीही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत उपस्थिती दर्शविली.


या उपक्रमामुळे गावात शैक्षणिक वातावरण अधिक बळकट होत असल्याचे चित्र दिसले.

स्पर्धेमुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# केंद्रीय अर्थसंकल्पातून ग्रामीण भारताची घोर उपेक्षा

### शेतकरी,कष्टकरी आणि कामगारांच्या तोंडाला पाने – प्रा.पंढरी पाठे यांची तीव्र टीका..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. १ फेब्रुवारी...**



आज संसदेमध्ये केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा ग्रामीण भारत,शेतीवर अवलंबून असलेला शेतकरी,कष्टकरी आणि कामगार वर्गासाठी अत्यंत निराशाजनक व नकारात्मक असल्याची तीव्र प्रतिक्रिया शेतकरी चळवळीचे कार्यकर्ते प्रा.पंढरी पाठे यांनी व्यक्त केली आहे.

देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागात वास्तव्यास असून त्यांचे जीवनमान थेट शेती व शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे.मात्र या अर्थसंकल्पामध्ये शेतीमालाला हमीभाव,कर्जमाफी,उत्पादन खर्चावर आधारित दर,सिंचन,पशुसंवर्धन,आदिवासी व कोरडवाहू भागातील विशेष तरतुदी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचे प्रा.पाठे यांनी सांगितले.

ते म्हणाले की,"हा अर्थसंकल्प शेतकरी व कामगारांचा नसून मोठ्या उद्योगपती,कॉर्पोरेट कंपन्या आणि शहरी उच्चभ्रू वर्गाला खुश करण्यासाठी सादर करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या,वाढता उत्पादन खर्च,बियाणे-खते-कीटकनाशकांचे वाढते दर, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान यावर ठोस उपाययोजना या अर्थसंकल्पात नाहीत."

महागाई नियंत्रणाबाबतही सरकार अपयशी ठरले असून,डिझेल,वीज,खत,औषधे आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या दरवाढीमुळे शेतकरी व कष्टकरी वर्ग पूर्णपणे मेटाकुटीला आला आहे.मनरेगा,सार्वजनिक वितरण व्यवस्था,आरोग्य व शिक्षण यांसारख्या ग्रामीण जीवनाशी थेट संबंधित योजनांसाठी भरीव तरतूद नसणे ही गंभीर बाब असल्याचेही प्रा.पाठे यांनी नमूद केले.

कामगार वर्गाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की,असंघटित क्षेत्रातील कामगार,शेतमजूर,महिला कामगार यांच्यासाठी कोणतीही ठोस सुरक्षा,वेतनवाढ किंवा सामाजिक संरक्षणाची हमी या अर्थसंकल्पात नाही. "कामगारांच्या श्रमावर देश उभा आहे,मात्र त्याच कामगाराला या अर्थसंकल्पात विसरले गेले आहे," अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

शेवटी प्रा.पंढरी पाठे यांनी स्पष्ट इशारा दिला की,"हा शेतकरी-विरोधी व ग्रामीण-विरोधी अर्थसंकल्प देशातील शेतकरी,कष्टकरी आणि कामगार स्वीकारणार नाहीत.या अन्यायकारक धोरणांच्या विरोधात येत्या काळात व्यापक शेतकरी व कामगार चळवळ उभी केली जाईल."

# लेक लाडकी योजना – मुलींच्या सशक्त भविष्यासाठी ठोस आधार

## मुलींच्या जन्माला सन्मान, शिक्षणाला बळ, भविष्यास आधार

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**

**वाशिम :** आजही समाजातील अनेक घटकांमध्ये मुलींच्या जन्माकडे पाहण्याची मानसिकता बदलण्याची गरज आहे. मुलगी म्हणजे ओझे नसून कुटुंबाचा आणि समाजाचा अभिमान आहे, ही जाणीव अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'लेक लाडकी योजना' १० ऑक्टोबर २०२३ पासून प्रभावीपणे राबविण्यास सुरुवात केली आहे. या योजनेच्या माध्यमातून मुलींचा जन्म, शिक्षण आणि सशक्तीकरणाला प्रोत्साहन देण्यात येत आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांचा संदेश**

"जिल्ह्यातील योजनेच्या निकषात बसणाऱ्या सर्व पात्र लाभार्थ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी 'लेक लाडकी योजने'चा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व मुलींच्या जन्माचे उत्सव साजरे करावेत." **— योगेश कुंभेजकर**
**जिल्हाधिकारी, वाशिम**

लेक लाडकी योजना ही केवळ एक सरकारी योजना नसून मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठीची गुंतवणूक आहे. आज शिक्षण घेतलेली, आत्मनिर्भर झालेली मुलगी उद्याच्या समाजाची दिशा ठरवेल. शासन, प्रशासन आणि समाजाने एकत्र येऊन या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केल्यास स्त्री–पुरुष समानतेकडे एक मोठे पाऊल टाकले जाईल.

लेक लाडकी योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे –

मुलींच्या जन्माचे स्वागत होणे,

स्त्री भ्रूणहत्या रोखणे,

**मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा संदेश**

"ग्रामीण भागातील लाभार्थींनी आपले अर्ज थेट अंगणवाडी सेविका यांचेकडे जमा करून पर्यवेक्षिका यांच्यामार्फत ऑनलाईन करून घ्यावेत व पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा."

**— अर्पित चौहान**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम**

लेक लाडकी योजना ही मुलींच्या सन्मान, शिक्षण आणि सशक्तीकरणाची मजबूत पायाभरणी आहे. प्रत्येक कुटुंबाने या योजनेचा लाभ घ्यावा आणि 'लेक म्हणजे लाडकीच' ही भावना समाजमनात रुजवावी, हीच काळाची गरज आहे.

मुलींच्या शिक्षणाला चालना देणे,

आर्थिक अडचणींमुळे शिक्षण खंडित होऊ न देणे,

मुलींमध्ये आत्मविश्वास व स्वावलंबन निर्माण करणे.

ही योजना केवळ आर्थिक सहाय्यापुरती मर्यादित नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ ठरत आहे.

योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी कुटुंबातील मुलींना टप्प्याटप्प्याने आर्थिक सहाय्य दिले जाते. मुलीच्या जन्मानंतर, शाळेत प्रवेश, शिक्षणातील विविध टप्पे पूर्ण केल्यानंतर थेट लाभ देण्यात येतो. यामुळे पालकांना मुलीच्या शिक्षणासाठी आर्थिक आधार मिळतो आणि मुलगी शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहते.

शिक्षणाला प्राधान्य

मुलीचे शिक्षण हेच सक्षम समाजाचे खरे भांडवल आहे. ही बाब लक्षात घेऊन या योजनेत शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. मुलगी नियमित शाळेत जात असल्यासच पुढील लाभ दिला जातो. त्यामुळे शालेय गळती कमी होण्यास मोठी मदत होत आहे.

सामाजिक बदलाची दिशा

लेक लाडकी योजनेमुळे मुलींच्या जन्माबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होत आहे. 'मुलगी म्हणजे लक्ष्मी' ही संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरू लागली आहे. ग्रामीण व शहरी भागात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असून अनेक कुटुंबांमध्ये मुलींच्या जन्माचा उत्सव साजरा केला जात आहे.

# ८ फेब्रुवारीला रुयाळ (सिंदपुरी )येथे महाविहाराचा वर्धापन दिन व माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा -** पवनी तालुक्यातील रुयाळ सिंदपुरी येते 8 फेब्रुवारी 2026 ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक संघटन महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्य महिला अधिकार सामाजिक संघटनेच्या वतीने महासमाधीभूमी धम्मोत्सव महाविद्यालयाचा वर्धापन दिन व माता रमाई यांच्या जयंती दिनानिमित्त विशाल ठवरे यांच्या शेतात व शेताला लागून सार्वजनिक ठिकाणी रुयाळ (सिंदपुरी) येथे कार्यक्रमाचे आयोजन दुपारी १२ वाजता करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संजय मेश्राम आमदार उमरेड विधानसभा क्षेत्र राहतील. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते होईल .सह उद्घाटक म्हणून खासदार प्रशांतजी पडोळे त्याचप्रमाणे आमदार राजकुमार बडोले सडक अर्जुनी यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील. तर प्रमुख पाहुणे म्हणून मोहन पंचभाई सदस्य दीपक भंडारा सदानंद धारगावे संस्थापक डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक संघटन, मीनाताई धारगावे, नम्रताई बागडे ,बादलजी ठवरे, शोभना सरोजगार ,मनिषा ताई भांडारकर ,सारिका नागदेवे ,मंजुषा चव्हाण ,स्मिताताई मरगडे ,पांडुरंग नंदागवळी, ,संजीव भांबोरे संपादक ब्ल्यू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनल ,वैशालीताई वैद्य,वर्षाताई पाटील ,सीमाताई काळे, पूजाताई पाटील ,यावेळी उपस्थित राहतील.



दुपारी २.३० वाजता भोजनदानाचा कार्यक्रम होईल. करिता वरील कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन तनुजा नागदेवे ,संगमित्रा चव्हाण ,पोर्णिमा खांडेकर साधनाताई कासारे,गोदावरी मारवाडे, रश्मी मारवाडकर ,अस्मिता नगरारे ,स्नेहल मेश्राम, दिपाली गजभिये, छाया कापगते ,वनिता बांडेबुचे ,मीनाताई मैने ,छायाताई कांबळे, रेखाताई भटकर, कांचनताई राऊत ,भारतीताई कांबळे ,भावना शेंडे ,कल्पना रामटेके, रजनी मेश्राम,वंदना सुखदेवे, वंदना भोयर अलका वासनीक, प्रज्ञा नंदेश्वर, दत्तू धारगावे, संघरत्न बोरकर ,प्रज्वल मेश्राम, संदीप मोहनकर, लंकेश धारगावे ,बबलू शहारे यांनी केलेले आहे.

# हेल्मेट नसेल तर धोका निश्चित; नवीन पनवेल वाहतूक शाखा (पळस्पे) पोलिसांचे जाणीवजागृती अभियान, दंडाऐवजी समजावणी; हेल्मेटसाठी नवीन पनवेल वाहतूक शाखा (पळस्पे) पोलिसांचा सकारात्मक दृष्टिकोन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

: राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान 2026च्या अनुषंगाने नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या वतीने पळस्पे फाटा येथे हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकी चालकांसाठी जनजागृतीपर आणि माणुसकीचा संदेश देणारा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. झालेल्या या उपक्रमात दंडात्मक कारवाईपेक्षा जनजागृतीवर भर देण्यात आला.

पोलीस उपायुक्त (वाहतूक) तिरुपती काकडे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त विजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी हेल्मेट न परिधान करता दुचाकी चालविणाऱ्या 50 मोटरसायकल चालकांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले. तसेच प्रत्येक चालकाला गुलाबपुष्प व हेलमेट देत, यापुढे प्रत्येक वेळी मोटरसायकल चालविताना हेल्मेट वापरण्याबाबत स्नेहपूर्वक प्रबोधन करण्यात आले.




बहुतांशी दुचाकी चालक हेल्मेटचा वापर टाळतात. त्यामागे विविध कारणे असतात. काहींना हेल्मेट सोबत घेऊन फिरणे व ते सांभाळणे कंटाळवाणे वाटते, तर काहींच्या मते हेल्मेट घातल्यावर ऐकायला कमी येते किंवा मान इकडे-तिकडे वळविण्यास अडचण होते. अनेकांना हेल्मेट हातात घेऊन किंवा वाहनावर ठेवून फिरण्याचा ताणही वाटतो. मात्र, अपघाताच्या वेळी हाच हेल्मेट तुमच्या जीवासाठी ढाल ठरतो, याकडे पोलिसांनी विशेष लक्ष वेधले. रस्त्यावर अपघात होऊन डोके आपटल्यास, हेल्मेट असल्याने मेंदूला थेट धक्का बसत नाही. हेल्मेट नसताना डोक्याला गंभीर मार लागल्यास ब्रेन हॅमरेज होऊन मेंदूमध्ये रक्तस्राव होतो. अशा परिस्थितीत अपघातग्रस्त व्यक्ती कोमात जाऊ शकते आणि काही वेळा कोमातून बाहेर न आल्यास मृत्यूही ओढवू शकतो. त्यामुळे हेल्मेट ही केवळ कायदेशीर अट नसून, जीव वाचविणारी सवय असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पोलीस हवालदार संजय गावडे, जितेंद्र कदम, ज्ञानेश्वर वाघ, आदिनाथ आघाव, श्रेयस जाधव, बाबा काच गुंडे तसेच महिला पोलीस हवालदार प्रियंका पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. वाहतूक पोलिसांच्या या सकारात्मक, समजूतदार आणि मानवतावादी उपक्रमाचे नागरिकांकडून विशेष कौतुक होत आहे.

# कायदा महाविद्यालयातील तरुणांचा मानव तस्करीविरोधात पनवेलमध्ये 'वॉक फॉर फ्रीडम' रॅलीद्वारे मूक जनजागृती; विद्यार्थ्यांच्या पावलांतून मानवतेचा संदेश

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : मानव तस्करीसारख्या गंभीर सामाजिक समस्येविरोधात जनजागृती निर्माण करण्यासाठी भागूबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ, पनवेल येथे 31 जानेवारी रोजी सकाळी 'वॉक फॉर फ्रीडम' ही मूक रॅली उत्साहात पार पडली. या रॅलीत महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, स्वयंसेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. राष्ट्रीय पातळीवर मानव तस्करी निर्मूलनासाठी राबविण्यात येणाऱ्या चळवळीचा एक भाग म्हणून भारतातील ३० हून अधिक ठिकाणी ही रॅली एकाच वेळी आयोजित करण्यात आली होती. पनवेल येथील रॅलीत १०० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवून मानव तस्करीविरोधातील लढ्यात आपली सामाजिक बांधिलकी व्यक्त केली.

या मूक रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे अध्यक्ष आर. व्ही. येोले, मुख्य कार्यक्रम अधिकारी आकाश पाटील व एनएसएस कार्यक्रम अधिकारी रुपेश माने यांच्या हस्ते करण्यात आले. रॅलीदरम्यान




सहभागी विद्यार्थी हातात मानव तस्करीची भयावह वास्तवता मांडणाऱ्या घोषणा असलेले फलक घेऊन एकाच रांगेत शांततेत मार्गक्रमण करत होते. मूक स्वरूपातील ही रॅली तस्करीच्या बळी ठरलेल्या, आवाज गमावलेल्या पीडितांप्रती एकजूट आणि संवेदनशीलतेचे प्रतीक ठरली. रॅलीची सुरुवात महाविद्यालय परिसरातून होऊन खांदा कॉलनी मंदिरापर्यंत झाली व त्यानंतर पुन्हा महाविद्यालयात समारोप झाला. रॅलीपूर्वी सहभागी विद्यार्थ्यांना मानव तस्करीची लक्षणे ओळखणे, संशयास्पद बाबी लक्षात आल्यास तत्काळ मदत कशी मिळवावी, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच १०९८ (चाइल्डलाइन), १८१ (महिला हेल्पलाईन) व १९३० (सायबर गुन्हे) या राष्ट्रीय मदत क्रमांकांची माहिती देऊन नागरिकांनी हे क्रमांक आपल्या मोबाईलमध्ये सेव्ह करण्याचे आवाहन करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार, सध्या जगभरात सुमारे ४९.६ दशलक्ष लोक आधुनिक गुलामगिरीचे बळी ठरत आहेत. भारतात दररोज सरासरी ४ मुले मानव तस्करीची शिकार होत असून, दररोज १२९ मुले बेपत्ता होत असल्याची नोंद राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या अहवालात आहे. अलीकडेच महाराष्ट्रातही अशा घटना उघडकीस आल्याने या विषयाची तीव्रता अधिक ठळक झाली आहे.